पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

14 वर्ष वर्धापन दिन

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३२२ ■ सोमवार, दि.१ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 /49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/ 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# अतिक्रमणावर रेल्वेचा हातोडा !

## ⏩ तार फाईल परिसरातील अतिक्रमण हटवण्यास सुरुवात ⏩ नागरिकांची घरं रिकामी करण्यासाठी पळापळ

प्रतिनिधी १ जून



**अकोला:** शहरातील तार फाईल परिसर क्रमांक ७ मधील रेल्वेच्या जागेवर करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांवर अखेर आज, सोमवार सकाळपासून रेल्वे प्रशासनाने धडक कारवाई सुरू केली आहे. रेल्वे आणि स्थानिक प्रशासनाच्या वतीने मोठ्या बुलडोझरसह शेकडो पोलीस कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात येत आहे. रेल्वेने अतिक्रमण हटवणार असल्याचा इशारा दिल्याने आणि आता कारवाई अटळ असल्याचे पाहून अनेक नागरिकांनी स्वतःहूनच आपले अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली. जवळपास १६५ घरांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

प्रशासनाने अतिक्रमणधारकांना सकाळी १० वाजेपर्यंतची मुदत दिली होती. ही नोटीस मिळताच तार फाईल परिसरात एकच खळबळ उडाली. अनेक वर्षांपासून या भागात राहणारे नागरिक, महिला, वृद्ध आणि लहान मुले आपल्या घरातील सामान सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी धावपळ करताना दिसले. वर्षानुवर्षांचे आशियाने डोळ्यांसमोर उजाड होत असल्याचे पाहून परिसरात अत्यंत भावूक वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाने त्यांना सामान हलवण्याची काही वेळ मोहलत दिली होती.

कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये किंवा विरोध होऊ नये, यासाठी रेल्वे सुरक्षा बल आणि स्थानिक पोलिसांचा मोठा ताफा तैनात करण्यात आला आहे. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या उपस्थितीत शेकडो पोलीस तैनात करण्यात आले होते. रेल्वे प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे की, रेल्वेच्या मालकीच्या जागेवर झालेले हे अतिक्रमण नियमानुसारच हटवले जात आहे. नागरिकांना त्यांचे साहित्य सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी पुरेशी संधी देण्यात आली होती.

# एकनाथ शिंदेंचे पुन्हा 'धक्कातंत्र'

प्रतिनिधी १ जून



**मुंबई :** परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा 'धक्कातंत्र' वापरले आहे. राजकीय वर्तुळातील सर्व अंदाज बाजूला सारत, उपमुख्यमंत्र्यांनी अल्पसंख्याक समाजातील तरुण चेहरा सईद खान यांना उमेदवारी जाहीर केली आहे. सईद खान हे सध्या शिवसेनेच्या अल्पसंख्याक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष असून ते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कोअर टीमचे अत्यंत विश्वासू सदस्य मानले जातात.

सईद खान यांच्या उमेदवारीमुळे मराठवाड्यातील राजकीय समीकरणे वेगाने बदलण्याची शक्यता आहे. शिवसेनेच्या पारंपरिक मतदारांसोबतच अल्पसंख्याक समाजाला महायुतीकडे खेचण्यासाठी उपमुख्यमंत्री शिंदेंनी टाकलेला हा पत्ता अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी टाकलेली ही राजकीय खेळी चर्चेचा विषय ठरत आहे.




# जेईई परीक्षेचा निकाल जाहीर

वृत्तसंस्था १ जून

**नवी दिल्ली :** जेईई परीक्षेचा निकाल सोमवारी सकाळी जाहीर करण्यात आला. शुभम कुमारने देशात पहिली रँक मिळवली आहे, तर मुलींमधून अरोही देशपांडेने पहिला क्रमांक पटकावला आहे. इंजिनिअरिंगसाठी घेतली जाणारी देशातील प्रतिष्ठित प्रवेश पूर्व परीक्षा 'जेईई ॲडव्हान्स्ड'चा निकाल सोमवारी जाहीर करण्यात आला. या परीक्षेत आयआयटी दिल्ली झोनच्या शुभम कुमारने ३६० पैकी ३३० गुण मिळवून 'कॉमन रँक लिस्ट'मध्ये अव्वल स्थान पटकावले आहे.

# अभिनेता अंकुर वाढवेवर पुसदमध्ये प्राणघातक हल्ल्याचा प्रयत्न...!

## पोलिसांच्या मध्यस्थीने अनर्थ टळला



प्रतिनिधी १ जून

**पुसद:** चला हवा येऊ द्या' फेम प्रसिद्ध अभिनेता अंकुर विठ्ठलराव वाढवे याच्यावर २९ मे रोजी पुसदमध्ये प्राणघातक हल्ल्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सुमारे २० ते ३० लोकांच्या टोळीने हा हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र सुदैवाने पोलिसांच्या मध्यस्थीमुळे मोठा अनर्थ टळला आहे.

अंकुर वाढवेने फेसबुक पोस्ट आणि लाईव्ह व्हिडिओच्या माध्यमातून त्याच्यावर ओढावलेली आपबिती सांगितली असून, पुसदमध्ये वाढलेल्या गुन्हेगारीवर चिंता व्यक्त केली आहे. अंकुर वाढवे सध्या पुसदमध्ये एका सिनेमाच्या चित्रीकरणासाठी आला आहे. त्याने दिलेल्या माहितीनुसार, या सिनेमाचा भाग असलेले काही मित्र त्याला भेटायला आले होते. त्यातील काही जणांनी मद्यपान केले होते आणि ते शेजारच्या घरावर लघुशंका करत होते. या प्रकाराला अंकुर आणि त्याच्या सहकाऱ्यांनी विरोध केला आणि त्यांना परत पाठविले. या गोष्टीचा राग धरून संबंधित तरुण ३० ते ४० जणांचे टोळके घेऊन मारहाण करण्यासाठी घटनास्थळी आला. यावेळी टोळीतील काही लोकांनी अंकुरला ओळखले त्यामुळे परिस्थिती अधिक चिघळली नाही.

# कमर्शियल सिलिंडर ५३ रुपयांनी महागले

वृत्तसंस्था १ जून

**नवी दिल्ली :** कमर्शियल सिलिंडर आज म्हणजेच १ जूनपासून ५३.५० रुपयांपर्यंत महाग झाला आहे. दिल्लीत तो ३११३.५० रुपयांना मिळत आहे. ५ किलोच्या इऊथ् सिलिंडरच्या किमतीत ११ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या वाढीनंतर आता 'छोटू' सिलिंडरची किंमत ८२१.५० रुपये झाली आहे. याशिवाय, पेट्रोल, डिझेल आणि ऊइ वरील नवीन निर्यात शुल्क कपात आजपासून लागू झाली आहे.

कमर्शियल सिलिंडरच्या किमती वाढल्याने रेस्टॉरंट मालकांचा खर्च वाढेल.





सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

सोमवार, दि. १ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## शेतकऱ्यांनी डीएपी खतास पर्यायी खते वापरावी!

**अकोला :** महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमिन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरीता अग्रेसर आहे. राज्यामध्ये लवकरच पेरणीला सुरुवात होणार असून डीएपी खताची शेतकऱ्यांकडून जास्त मागणी होणार आहे. डीएपी (डी अमोनिअम फॉस्फेट) खतामध्ये १८ टक्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत. राज्यामध्ये डीएपी खताचा पुरवठा अपेक्षेप्रमाणे होत नाही त्यामुळे पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरद युक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट) या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-१६ टक्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामूळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे.

# ‘जय मल्हार’च्या जयघोषाने दुमदुमले शहर !

## शोभायात्रेत महिला, युवक, ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग, शोभायात्रेचे ठिकठिकाणी स्वागत

प्रतिनिधी १ जून







**अकोला :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त अकोला शहरात धनगर समाज बांधवांच्या वतीने शोभायात्रा काढण्यात आली. जय मल्हारच्या घोषणांनी दुमदुमलेल्या या शोभायात्रेत महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच समाजबांधवांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशांचा गजर आणि सांस्कृतिक सादरीकरणांमुळे संपूर्ण शहर भक्तिमय व उत्सवी वातावरणाने भारावून गेले.

प्रमिलाताई ओक सभागृह येथून शोभायात्रेला प्रारंभ झाला. पिवळे दुपट्टे परिधान केलेले समाजबांधव आकर्षणाचे केंद्र ठरले. महिलांनी ढोल-ताशांच्या तालावर पारंपरिक नृत्य सादर करत फुगड्यांचा फेर धरला, विविध ठिकाणी शोभायात्रेवर पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. शोभायात्रेच्या मार्गावर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांना अभिवादन केले. कार्यक्रमाला धनगर समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद गटनेते ज्ञानेश्वर सुलताने, शोभायात्रा समिती अध्यक्ष गोपाल गावंडे, महासचिव मनोज करणकार, सेवानिवृत्त पोलिस उपअधीक्षक नारायण खान मोटेसराई, केशवराव पातोंड, माजी महापौर सुमन गावंडे, गोपाल कोल्हे, प्रज्योत नागे, प्रणित नागे, बळीराम चिकटे, काशीराम साबळे, ॲड. नरेंद्र बेलसरे, डॉ. सुरेश बचे, मधुकर काळे, सरपंच दीपक पातोंड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करत समाजातील ऐक्य, संस्कृती आणि परंपरेचे दर्शन घडविणारी ही शोभायात्रा अकोलेकरांसाठी विशेष आकर्षण ठरली. यावेळी अश्वासह विविध प्रात्यक्षिके उपस्थितांचे लक्ष वेधणारे ठरले.

### विविध ठिकाणी स्वागत

शोभायात्रेचे विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. यामध्ये खासदार अनुप धोत्रे, आमदार साजिद खान पठाण, माजी आमदार अमोल मिटकरी, माजी महापौर विजय अग्रवाल, मनिष गावंडे, डॉ. शंकरराव वाकोडे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, जिल्हा महासचिव मिलिंद इंगळे, गजानन गवई, अ?ॅड. संतोष रहाटे, बालमुकुंद भिरह, संगीता अढाऊ, किशोर जामनिक आणि प्रल्हाद बोरे यांचाही समावेश होता.

## उरळ पोलिसांची अवैध गावठी हातभट्टी दारू व देशी दारू अड्डयावर धाड

### तिन आरोपींवर गुन्हा

प्रतिनिधी १ जून



**बाळापूर :** तालुक्यातील उरळ पोलिसांनी अवैध गावठी हातभट्टी दारू व देशी दारू व्यवसायावर मोठी कारवाई करत तिन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत मोठ्या प्रमाणात सडवा मोहाचा माल व दारू गाळण्यासाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक ३१ मई २०२६ रोजी सकाळी गुप्त माहितीच्या आधारे उरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी उपनिरिक्षक गणेश कायंदे अनेक कर्मचारी यांच्या नेतृत्वाखाली लोहारा शेतशिवारात छापा टाकण्यात आला. यावेळी तुळशीराम सदाशिव मोरे आणि सुभाष शामराव मिसाळ दोन्ही रहाणार लोहारा दोनहि आरोपिविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे या कारवाईत मोट्या प्रमाणात सडवा मोहाचा माल व दारु गाळण्यासाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले त्यामधे५४५००. आणि ४६००० असा एकुन एक लाख ५०० रु किमतीचा मोहा सडवा गावढी नष्ट केली आहे. तसेच मोरगाव भाकरे येथील स्वप्रील मिलिंद शिरसाठ यांचेवर अवैद देशी विक्री साठी बाळगण्याबाबत रेड करुण त्यांच्या जवडून१२०० रुपयांची देशी दारू जप्त करुण गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

## हिवरखेड पोलिस स्टेशनला १, जूनची सकाळ ठरली धावपळीची

**हिवरखेड :** पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या वारी भैरवगड परिसरातील पूर्णवसन असलेले आदिवासी बांधवाचे बारुखेडा या वस्तीतील घडली ही दुदैवी संशयास्पद घटना काही दिवसापूर्वी झालेल्या या नववधूचां साखरपुडा माहेरवरून सासरी आली असता, सासरी झाली प्रतिभा निहार या तरुणीची हत्या की आत्महत्या याबाबत युवतीचा मर्ग तेल्हारा ग्रामीण रूग्णालयात पी एम करण्यासाठी रवाना करण्यात आला, तरुणीच्या नातेवाईकांनी याबाबत हिवरखेड पोलिस स्टेशन तक्रार दाखल केली, या घटनेचा पुढील तपास हिवरखेड पोलिस करीत असून याबाबत पी एम रिपोटची माहिती लवकरच घेऊन या घटनेचा खुला केला जाईल, या घटनेची तक्रार पोलिस स्टेशनला सुरू असताच आणखी एका तक्रारीने पोलिस स्टेशनमध्ये भर पडली हिवरखेड येथील जुन्या वादातून दोन गटात हाणामारी झाली याबाबत पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल प्रक्रिया सुरु आहे

## ६५ फुल खोल खदानीतील युवकाचा मृतदेह काढला बाहेर!

### पिंजर येथील मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाऊंडेशनचा पुढाकार

प्रतिनिधी १ जून



**अकोला :** खदानीत बुडालेल्या युवकाचा कालपासून खदानीत शोध मोहीम चालू होती परंतु तो युवक नेमक कुठे बुडाला हे स्पॉट लोकेशन कोणाला माहीती नसल्याने शोध घेणे शक्य होत नव्हते. शेवटी आज पिंजर येथील मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाउंडेशनच्या जवानांनी अथक प्रयत्नांनंतर ६५ फूट खोल खदानीतील युवकाचा मृतदेह बाहेर काढला.

बार्शीटाकळी पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार अकोला जिल्ह्यातील कुंभारी ते विझोरा रोडवरील बार्शीटाकळी पोलीस स्टेशन हद्दीतील सा.बां.खा.च्या खदानीत अकोला येथील युवक बुडाल्याची माहीती सोमवारी सकाळी ६ वाजता पिंजर येथील मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाऊंडेशन संचालित संत गाडगे बाबा आपात्कालीन शोध व बचाव पथकाचे प्रमुख जिवन-रक्षक दिपक सदाफळे यांना देऊन तात्काळ पाचारण करण्यात आले. तेव्हा लगेच पथक प्रमुख दिपक सदाफळे आणी त्यांचे सहकारी शेखर केवट, ऋषीकेश राखोंडे, विष्णु केवट यांचेसह शोध व बचाव साहीत्यासह घटनास्थळावर ७ वाजता दाखल झालेत घटनास्थळ ट्रेसींग केले असता खदानीत ६० ते ६५ फुट खोल पाणी आणी तळाशी दगड चिफा असल्याचे निदर्शनास आले. तेव्हा बार्शीटाकळी पोलीस स्टेशन चे ठाणेदार प्रविण धुमाळ यांचे आदेशानुसार पीएसआय निलेश चाटे यांचे मार्गदर्शनात एएसआय अनिल येण्णेवार, पो.कॉ.योगेश पडवळ यांचे उपस्थितीत सर्च ऑपरेशन चालु केले. अवघ्या २० मिनिटातच तळाशी असलेला मृतदेह शोधून बाहेर काढून पोलीसांचे ताब्यात दिला. मृतदेह बाहेर काढताच घटनास्थळी मदतीसाठी उपस्थित असलेले मृतकाचे मावसे मंगेश गवई रा.विझोरा यांनी अनुकल्प सुनिल वाघमारे रा.कृषीनगर अकोला (१७) हाच असल्याचे सांगीतल्याने ओळख निष्पन्न झाली. यावेळी घटनास्थळावर नातेवाईकांसह सहकार्या साठी विझोरा येथील नागरिक हजर होते. जि. आ. व्य. अ.संदीप साबळे, पिंजर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गंगाधर दराडे संपर्कात होते.

## तंबाखू विरोधी दिनानिमित्त विविध कार्यक्रम उत्साहात



**अकोला :** दरवर्षी ३१ मे रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा केला जातो. तंबाखू सेवनामुळे होणारे जीवघेणे आजार, पर्यावरणाची हानी आणि त्यावरील उपचारांविषयी समाजात जनजागृती करणे हे या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट आहे. तंबाखू चे वाढते सेवन हे सार्वजनिक आरोग्याच्या चे दृष्टीने गंभीर आव्हान बनत आहे. तंबाखू सेवनामुळे मुखाचा कर्करोग, हृदयविकार आणि फुफ्फुसाचे गंभीर आजार होतात. या घातक व्यसनापासून लोकांना दूर राहण्यास प्रवृत्त करणे हे या दिवसाचे मुख्य ध्येय आहे. तंबाखू न सेवन करणाऱ्यांनाही याचा त्रास होतो, त्यामुळे सर्वांच्या आरोग्याचे रक्षण करणे महत्त्वाचे असते. टिळक पार्क योग परिवार तर्फे या विषयावर आधारित मोहिमा राबवून लोकांना तंबाखू सोडण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. तंबाखूमुक्त समाज घडवणे ही काळाची गरज आहे. या दिनाचे महत्त्व साधुन डॉ सुरेश राठी. यांनी तंबाखू, गुटखाबंदी, सिगारेट, दारु यावर अतिशय सुंदर कार्यक्रम सादर केला. सर्वांनी तंबाखू मुक्त जीवनाचा संकल्प करावा असे आवाहन केले, या प्रसंगी सर्वांनी एकत्रित येऊन, ‘व्यसन छोडो, परिवार जोडो’, व ‘बीडी पीकर खासरहा है, मौत के आगे नाच रहा है’, असे नारे दिले. या कार्यक्रमाला योग परिवार सर्व योग साधकांनी सहभाग घेतला, प्रामुख्याने श्रीकांत चाळीसगावकर, चंद्रशेखर फुलझेले, सतीश फडणीस, अमित पाठक, संजयपारेख, महेश पहारीया, संदिप खरे, निलेश जाजु, नानोटी, मार्तंड मेश्राम, अशोक राऊत ,अनिल नाईक, जगदिश अग्रवाल क्षितिजा काटे, सीमा फडणीस, सारीका शर्मा, सीमा फुलझेले, रेखा काठोळे, दिपाली वैद्य, अनुराधा ठोकळ व ईतर नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीकांत चाळीसगावकर, क्षितिजा वडी, सतीश फडणीस, चंद्रशेखर फुलझेले यांनी परिश्रम घेतले.

## घुसरवाडी येथे सर्पदंशाने महिलेचा मृत्यू

**अकोला :** येथून जवळ असलेल्या घुसरवाडी येथील शेषराव मौराबाई वानखडे (६०) यांचा ३० मे रोजी रात्री सर्पदंशाने मृत्यू झाला. सविस्तर माहिती नुसार धुसरवाडी येथील रहिवासी शेषराव प्रल्हाद वानखडे व त्यांचे कुटुंब राहतात. ३० मे रोजी मिराबाई शेकराव वानखडे यांना झोपेत सापाने चार जागी चावा घेतला. त्यांना तत्काळ अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले असता उपचार करीत असताना तेथील डॉक्टरांनी मृत घोषित केले. या घटनेची माहिती अकोट फाइल पोलीस स्टेशनसह अकोला तहसीलदार व पटवारी यांना देण्यात आली असून पुढील तपास अकोट फाइल पोलीस स्टेशन करीत आहेत.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य प्रेरणादायी -आ. रणधीर सावरकर

### जिल्हा भाजपा कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

प्रतिनिधी १ जून



**अकोला :** भारतीय जनता पक्षाच्या अकोला जिल्हा कार्यालयात आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी भाजपा विधिमंडळ पक्षाचे मुख्य प्रतोद तथा अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री.रणधीरजी सावरकर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी बोलताना आमदार रणधीरजी सावरकर साहेब म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी न्यायप्रिय, लोककल्याणकारी आणि विकासाभिमुख प्रशासनाचा आदर्श देशासमोर ठेवला. त्यांनी देशभरातील अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि सार्वजनिक सुविधांच्या उभारणीसाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कार्यातून समाजसेवा, सुशासन आणि स्त्रीशक्तीचा प्रभावी संदेश मिळतो. आजच्या पिढीने त्यांच्या जीवनचरित्रातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य केले पाहिजे. अहिल्यादेवी होळकर या न्याय, धर्म, लोककल्याण आणि सुशासनाचे प्रतीक मानल्या जातात.

कार्यक्रमास भाजपाचे जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, जिल्हा संघटन सरचिटणीस माधव मानकर, भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मनीष गावंडे, भाजप मन की बात अभियानाचे प्रमुख ॲड. अभिमन्यू नळकांडे, मुर्तीजापुर मन की बात संयोजक विजय खिरडकर, युवा नेते उमेश पवार यांच्यासह भारतीय जनता पार्टी मोर्चा व आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले.

## आजपासून एसटीची स्वच्छतागृहे मोफत....!

### बसस्थानके चकाचक आणि प्रवासही होणार सुखकर

**अकोला :** राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या ७८व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून आज, १ जूनपासून विशेष स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ करण्यात येत असून, त्याअंतर्गत यंदा ७८ हजार रोपांची लागवड केली जाणार आहे. तसेच प्रवाशांना एसटीच्या सर्व स्वच्छतागृहांचा मोफत वापर करता येणार आहे. मात्र या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर महामंडळाने आधीच, म्हणजेच १५ एप्रिलपासून प्रवाशांच्या प्रत्येक तिकिटावर दोन रुपयांचा अधिभार लागू केलेला आहे.





अधिकचे भाडेवाढ करूनही एसटी बसस्थानक तसेच आगारातील स्वच्छतागृहे स्वच्छ नसल्याच्या अनेक तक्रारी प्रवाशांकडून येत होत्या. इतकेच नव्हे तर स्थानक-आगार परिसरातील अस्वच्छता आणि पाणपोईंची दुरवस्था पाहायला मिळते. यामुळे प्रवाशांनी एसटीकडे नाक मुरडण्यास सुरुवात केली होती. याच पार्श्वभूमीवर प्रवासी सुविधा वाढवण्यासाठी महामंडळाकडून स्वच्छता मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत स्थानक आणि आगार परिसराची दर चार तासांनी स्वच्छता, पाणपोई सुरू करणे तसेच चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांमध्ये अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दोन महिन्यांपूर्वी केलेल्या घोषणेनुसार, स्वच्छतागृहांच्या देखभालीसाठी असलेली खासगी कंत्राटदारी व्यवस्था आता बंद करण्यात आली आहे. पूर्वी कंत्राटदारांकडे जबाबदारी असूनही अस्वच्छतेच्या तक्रारी कायम येत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असून, आता स्वच्छतागृहांची देखभाल आणि सर्व सुविधा पुरवण्याची जबाबदारी पूर्णपणे एसटी महामंडळाने स्वतःकडे घेतल्यामुळे राज्यातील सर्व आगारांमध्ये प्रवाशांना एकसमान आणि उत्तम सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

प्रशासनाच्या या नव्या निर्णयामुळे प्रवाशांचा प्रवासादरम्यान होणारा अतिरिक्त खर्च वाचणार असून, स्वच्छतागृहांमधील सुविधा आणि स्वच्छतेचा दर्जा सुधारण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. यासोबतच प्रवाशांना स्वच्छ आणि थंड पाणी मिळावे यासाठी प्रमुख बसस्थानकांवर मोफत पिण्याच्या पाण्याची स्थानके उभारण्याची महामंडळाची योजना आहे. या सर्व सोयी-सुविधांमुळे प्रवाशांना आता कमीत कमी खर्चात अधिक आरामदायी आणि सुखकर एसटी प्रवासाचा लाभ घेता येणार आहे.

# सुरेशभाऊ मापारी वाढदिवस विशेष...



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. १ जून २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# गुरफळी घाटावर रेती माफियांचे साम्राज्य; पोकलेन-हायवांचा धडाका

## महसूल विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह



प्रतिनिधी १ जून

**उमरखेड :** पैनगंगा नदीपात्रातील गुरफळी रेती घाटावर मोठ्या प्रमाणात अवैध रेती उत्खनन सुरू असल्याचा आरोप होत असून, या प्रकाराकडे महसूल विभाग दुर्लक्ष करत असल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे. अवैध उत्खननामुळे शासनाचा महसूल बुडत असल्याबरोबरच घरकुल लाभार्थ्यांनाही वाढीव दराने रेती खरेदी करावी लागत असल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गुरफळी रेती घाटावर पोकलेन आणि हायवा वाहनांच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर रेतीचा उपसा केला जात आहे. घाटाचा अधिकृत लिलाव झालेला असला तरी मंजूर क्षमतेपेक्षा अधिक रेती उपसली जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. मात्र, याबाबत महसूल विभागाकडून अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

कागदोपत्री गुरफळी रेती घाटाचे परिमाण ४५० मीटर लांबी, २५ मीटर रुंदी आणि २.५० मीटर खोली इतके असल्याचे सांगितले जाते. या घाटात सुमारे १,९८८ ब्रास रेती उपलब्ध असल्याचे नमूद असून त्यापैकी १,७८९ ब्रास रेती उत्खननासाठी ग्राह्य धरण्यात आली आहे. प्रत्यक्षात यापेक्षा अधिक उत्खनन झाले असल्याचा दावा नागरिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे घाटाची फेरमोजणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे.

### अन्य घाटांबाबतही तक्रारी

गुरफळी घाटासह बोरी-चातारी आणि कारखेड परिसरातही अवैध रेती उत्खनन सुरू असल्याचा आरोप होत आहे. लिलाव न झालेल्या घाटांमधूनही रेती उपसा होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. संबंधित प्रकरणांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांकडून करण्यात येत आहे.

वारंवार तक्रारी होऊनही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत असून, जिल्हा प्रशासन आणि महसूल विभाग या प्रकरणाची दखल घेऊन वस्तुस्थिती स्पष्ट करणार का, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### घरकुल लाभार्थ्यांवर आर्थिक ताण

■ अवैध उत्खननाच्या आरोपांसोबतच रेतीचे दरही वाढल्याची तक्रार समोर येत आहे. घरकुल योजनेअंतर्गत घरे बांधणाऱ्या लाभार्थ्यांना रेतीसाठी जास्त पैसे मोजावे लागत असल्याने त्यांच्यावर आर्थिक ताण वाढला आहे. शासनाच्या विविध घरकुल योजनांचा लाभ घेणाऱ्या कुटुंबांना याचा फटका बसत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### कारवाईबाबत संशय

■ घाटावर कारवाईसाठी महसूल विभागाचे पथक रवाना होण्यापूर्वीच संबंधितांना माहिती मिळते आणि उत्खनन करणारी यंत्रसामग्री हटवली जाते, अशी चर्चा स्थानिक पातळीवर सुरू आहे. या आरोपांमुळे महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मात्र, यासंदर्भात अधिकृतरीत्या कोणतीही पुष्टी झालेली नाही.

# दारू न दिल्याच्या रागातून मॅनेजरवर चाकूहल्ला; आरोपी जेरबंद

प्रतिनिधी १ जून



**आर्णी :** आर्णी शहरातील देशी दारू दुकानाच्या मॅनेजरवर जीवघेणा चाकूहल्ला करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या 48 तासांत अटक केली. सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 29 मे रोजी रात्री रामराव रमेश मिसाळ (वय 50, रा. शिवाजी नगर, आर्णी) हे हिरा टॉकीज परिसरातील देशी दारू दुकान बंद करून घरी जात होते. त्यावेळी एका अज्ञात व्यक्तीने त्यांच्याकडे दारूची मागणी केली. दुकान बंद झाल्याने दारू देण्यास नकार दिल्याचा राग मनात धरून आरोपीने त्यांच्याशी वाद घालत पोटावर व पाठीवर चाकूने वार केले. या हल्ल्यात मिसाळ गंभीर जखमी झाले.

या प्रकरणी आर्णी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 109(1) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक कुमार चिंता व अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाच्या सूचना दिल्या.

तपासादरम्यान घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी करण्यात आली. त्यामध्ये संशयिताची ओळख पटल्याने गुप्त माहितीच्या आधारे आरोपी तौफिक रफिक शहा (वय 22, रा. गिरोली, ता. मानोरा, जि. वाशिम) याचा शोध घेण्यात आला. तो दिग्रस परिसरात असल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्याला आर्णी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सतीश चवरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन राठोड, गजानन राजमल्लू, पोलीस उपनिरीक्षक शिवशंकर कायंदे तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# ८० किलो मांस जप्त, चौघांना अटक

प्रतिनिधी १ जून

**उमरखेड :** शहरातील नागापूर-रुपाळा परिसरातील तातारशहा मदरसा जवळील एका पत्र्याच्या शेडमध्ये बेकायदेशीररीत्या गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल करून मांस विक्री केली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर उमरखेड पोलिसांनी शनिवारी (३० मे) दुपारी छापा टाकून चौघांना अटक केली. या कारवाईत ८० किलो गोवंशाचे मांस जप्त करण्यात आले असून, दोन संशयित आरोपी फरार झाले आहेत. एकूण ३१ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उमरखेड पोलीस ठाण्याच्या 'डायल ११२' पथकास नागापूर-रुपाळा परिसरात गोवंश जनावरांची कत्तल सुरू असल्याची विश्वसनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक गणेश मुंढे, पोलीस उपनिरीक्षक सागर इंगळे व अन्य कर्मचाऱ्यांच्या पथकाने दोन पंचांसह तातारशहा मदरसा परिसरातील पत्र्याच्या शेडवर दुपारी सुमारे दीड वाजता छापा टाकला.

छाप्यादरम्यान पोलिसांना पाहताच दोन जण घटनास्थळावरून पसार झाले. मात्र चार जणांना जागीच ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेल्यांमध्ये एजाज अहमद शेख युसुफ (५२, रा. रहीमनगर), मोहम्मद जहुर मोहम्मद युसूफ (३६, रा. ताजपुरा वॉर्ड), शेख निसार शेख उस्मान (५८, रा. डॉ. झाकीर हुसेन वॉर्ड) आणि हमीद खान नुर खान (६०, रा. तातारशहा वॉर्ड, सर्व रा. उमरखेड) यांचा समावेश आहे.

शेडची तपासणी केली असता एक गोवंश जातीचे जनावर गळा कापलेल्या अवस्थेत मृत आढळले. तसेच मोठ्या प्रमाणात मांस सापडल्याने पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. चंद्रकांत सेवनकर यांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले. त्यांच्या उपस्थितीत पंचनामा करून ८० किलो मांसासह अन्य साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, फरार दोन आरोपींचा शोध सुरू आहे. पुढील तपास उमरखेड पोलीस करीत आहेत.

# माळेगावमध्ये भीषण पाणीटंचाई; टँकरच्या पाण्यासाठी नागरिकांची झुंबड

प्रतिनिधी १ जून





**दारव्हा :** दारव्हा तालुक्यातील माळेगाव येथे यंदाच्या उन्हाळ्यात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. सुमारे ६०० ते ७०० लोकसंख्या असलेल्या या गावातील पारंपरिक जलस्त्रोत कोरडे पडल्याने नागरिकांची संपूर्ण भिस्त टँकरवर अवलंबून आहे.

गावात येणाऱ्या पाणी टँकरची प्रतीक्षा नागरिकांना तासन्तास करावी लागत असून टँकर पोहोचताच पाणी भरण्यासाठी मोठी गर्दी उसळते. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांनाही पाण्यासाठी रांगेत उभे राहावे लागत आहे. अनेकदा उपलब्ध पाणी सर्वांपर्यंत पोहोचत नसल्याने काही कुटुंबांना अपुऱ्या पाण्यावर दिवस काढावा लागत आहे. विशेष म्हणजे, मिळणारे पाणी केवळ घरगुती वापरासाठीही पुरेसे नसताना पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. वाढत्या तापमानामुळे पाण्याची मागणी वाढली असताना पुरवठा मात्र अत्यंत मर्यादित असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. माळेगावातील पाणीटंचाईचा प्रश्न तातडीने सोडवून नियमित व पुरेसा पाणीपुरवठा करावा, तसेच अतिरिक्त टँकर उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी ग्रामस्थांकडून प्रशासनाकडे करण्यात येत आहे. पाण्याच्या समस्येमुळे गावकऱ्यांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून प्रशासनाने त्वरित उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

# राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

प्रतिनिधी १ जून



**यवतमाळ :** पुण्यश्लोक राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त यवतमाळ नगरपालिकेच्या नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके यांनी येरावार चौक येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष ॲड. उईके यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी, न्यायप्रिय, धर्मनिरपेक्ष आणि आदर्श शासनव्यवस्थेचा गौरव केला. जनतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा तसेच विविध सार्वजनिक बांधकामे उभारून समाजसेवेचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या दूरदृष्टी, परोपकारी वृत्ती आणि जनहिताच्या कार्यामुळे भारतीय इतिहासात त्यांचे अजरामर स्थान असल्याचे त्यांनी सांगितले. अहिल्यादेवी होळकर यांनी स्त्रीशक्ती, सुशासन आणि लोकसेवेचा आदर्श संपूर्ण देशासमोर ठेवला. त्यांचे विचार, कार्य आणि संस्कार भावी पिढ्यांसाठी सदैव प्रेरणादायी राहतील, असे मतही नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके यांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थितांनी राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याचे स्मरण करून त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन केले.

# केळापूर तालुका किसान सभा अध्यक्षपदी दिलीप कुमरे

प्रतिनिधी १ जून




**पाटणबोरी :** अखिल भारतीय किसान सभेचे केळापूर तालुका अधिवेशन रविवारी (३१ मे) पाटणबोरी येथील कालिका मंदिर सभागृहात उत्साहात पार पडले. दर तीन वर्षांनी होणाऱ्या या अधिवेशनात मागील कार्यकाळाचा आढावा घेण्यात आला तसेच पुढील तीन वर्षांसाठी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यावेळी दिलीप कुमरे यांची केळापूर तालुका अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली.

अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते कुमार मोहरमपुरी होते. प्रमुख पाहुणे म्हणून किसान सभा जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर सिडाम, जनवादी महिला संघटनेच्या माजी अध्यक्षा अनिता खूणकर, सुरेखा बिरकुलवार, गजानन ताकसांडे, किसन मोहुर्ले व बादल कोडापे उपस्थित होते. नवीन कार्यकारिणीत सुरेखा बिरकुलवार यांची सचिवपदी, तर सुभाष कोडापे, महेंद्र मन्ने, संतोष आत्राम, विठ्ठल दासरवार, विनोद अरके, प्रकाश संकरवार, रवी मेश्राम, तुळसाबाई कुडमेथे आणि अन्नपूर्णा आडे यांची विविध पदांवर निवड करण्यात आली.

प्रास्ताविक चंद्रशेखर सिडाम यांनी केले. यावेळी कुमार मोहरमपुरी, अनिता खूणकर, किसन मोहुर्ले आणि गजानन ताकसांडे यांनी शेतकरी प्रश्नांवर मार्गदर्शन केले. अधिवेशनाला तालुक्यातील विविध गावांतील ९५ महिला-पुरुष प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी चंद्रशेखर सिडाम यांनी वाढते तापमान आणि पर्यावरण संवर्धनाची गरज लक्षात घेऊन किसान सभेच्या प्रत्येक सदस्याने आपल्या शेतात किमान दोन झाडे लावून त्यांचे संगोपन करावे, असे आवाहन केले.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात

प्रतिनिधी १ जून



**महागाव :** राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती ३१ मे रोजी महागाव तालुक्यातील विविध गावांमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी चौंडी (जि. अहिल्यानगर) येथे झाला. माळवा संस्थानाच्या त्या न्यायप्रिय, दूरदृष्टी असलेल्या आणि प्रजाहितदक्ष शासक म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी जवळपास २९ वर्षे आदर्श राज्यकारभार करत जनकल्याणासाठी अनेक उल्लेखनीय कार्ये केली.

काशी, सोमनाथ, उज्जैन, नाशिक, द्वारका यांसारख्या देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांमध्ये मंदिरे, घाट आणि धर्मशाळांची उभारणी करून त्यांनी धार्मिक व सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी मोठे योगदान दिले. तसेच सतीप्रथेसारख्या अनिष्ट रूढींना विरोध करत महिलांच्या सन्मानासाठी कार्य केले आणि विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन देऊन समाजसुधारणेचा आदर्श घालून दिला.

जयंतीनिमित्त महागाव तालुक्यातील सवना, दहिसावळी, टेंभी, महागाव, हिवरा, फुलसावंगी, काळी दौलतखान, वाकोडी, मोरथ, धारमोहा आदी गावांमध्ये प्रतिमापूजन, अभिवादन, मिरवणुका तसेच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याला अभिवादन केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवींच्या लोककल्याणकारी, न्यायनिष्ठ आणि समाजहिताच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा आदर्श समाजाने अंगीकारण्याचे आवाहन केले. जयंती उत्सवामुळे तालुकाभरात भक्तिमय आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले होते.

# पावसाळ्यापूर्वी नाल्यांची साफसफाई करा; उत्तरवार ले-आऊटमधील नागरिकांची मागणी

## नगर परिषद प्रशासनावर दुर्लक्षाचा आरोप

प्रतिनिधी १ जून

**पांढरकवडा :** शहरातील उत्तरवार ले-आऊट परिसरातील गटारे व नाल्यांची साफसफाई करण्याच्या मागणीकडे नगर परिषद प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. यासंदर्भात रहिवासी अजयकुमार बाबाराव शामकुवर यांनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांना निवेदन देऊन तातडीने साफसफाईची मागणी केली होती. मात्र निवेदन दिल्यानंतर तब्बल ८ ते ९ दिवस उलटूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

उत्तरवार ले-आऊट परिसरातील अनेक नाल्या व गटारे गाळ, माती, प्लास्टिक आणि इतर कचऱ्याने भरून गेली आहेत. काही ठिकाणी नाल्यांमध्ये गवत, झुडपे तसेच लहान झाडे उगवली असून त्यामुळे सांडपाण्याचा प्रवाह अडथळाग्रस्त झाला आहे. पावसाळा तोंडावर आला असताना या नाल्यांची स्थिती चिंताजनक बनली आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पावसाळ्यात नाल्यांमध्ये पाणी तुंबल्यास परिसरात दुर्गंधी पसरू शकते. तसेच डासांचे प्रमाण वाढून मलेरिया, डेंग्यूसारख्या साथीच्या आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवसांत पावसाचे संकेत दिल्याने नागरिकांची चिंता अधिक वाढली आहे.

नागरिकांनी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप साफसफाईचे काम सुरू झाले नसल्याची खंत व्यक्त केली आहे. पावसाळ्यापूर्वी नाल्यांमधील गाळ व कचरा काढून संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात यावी, अशी मागणी रहिवाशांनी पुन्हा एकदा केली आहे.

नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेऊन नगर परिषद प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी तसेच संभाव्य पूरस्थिती आणि साथीच्या रोगांचा धोका टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी उत्तरवार ले-आऊट परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

सिटी न्यूज अमरावती

सोमवार, दि. १ जून २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## दर्यापुरात फर्निचर वर्क च्या दुकानाला भिषण आग




**दर्यापूर :** शहरातील अकोट रोल्ड मार्गावरील फर्निचर वर्क च्या दुकानाला शनिवारी सायंकाळच्या सुमारास भिषण आग लागली यामध्ये दुकानातील फर्निचर जळून खाक झाले असून अग्निशमन बंब लवकर पोहोचल्याने आग आटोक्यात आली. दर्यापूर शहरातील मुख्य मार्ग असलेल्या अकोट रोड वरील आदर्श हायस्कूल समोर असलेल्या गरीब नवाज या फर्निचर च्या दुकानाला भिषण आग लागल्याने बनवून तयार असलेले फर्निचर जळून खाक झाले आहे. या दुकानाच्या बाजूला मेडिकल तसेच दुकानाच्या मागील बाजूला रहिवाशीयांची घरे असल्याने भितीचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी आग लागल्याचे लक्षात येताच दुकान मालकाने दर्यापूर नगरपरिषद अग्निशमन ला पाचरण केल्याने व तात्काळ अग्निशमन बंब पोहोचल्याने आगीवर नियंत्र मिळविण्यात आले.

# चार महिलांचे बळी देणारी वाघीण मेळघाटात सोडणार ?

प्रतिनिधी १ जून

### ◆ नागरिक भयभीत , वन विभागाचा अजब कारभार



**अमरावती :** सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही इथं चार महिलांचा बळी घेणाऱ्या वाघिणीला परतवाड्यात आणण्यात आलं वाघिणीला मेळघाटात सोडण्यात येण्याची चर्चा सुरू झाल्यानं नागरिक हादरले आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यात सिंदेवाही तालुक्यातील जंगलात तेंदुपत्ता संकलनासाठी गेलेल्या चार महिलांवर हल्ला करून त्यांना वाघिणीनं ठार मारलं होतं. या वाघिणीला अमरावती जिल्ह्यातील मेळघाटच्या जंगलात सोडलं जाणार असल्याची चर्चा आहे.

विशेष म्हणजे या वाघिणीला आज परतवाडा इथं आणण्यात आलं आहे. चार महिलांना ठार करणारी वाघीण परतवाड्यात आणल्यानं नागरिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

दुसरीकंड या वाघिणीला परतवाड्याला आणलं मात्र तिला कुठं ठेवायचं हे अद्याप ठरलं नसल्याची माहिती परतवाडा येथील सहाय्यक वनरक्षक विक्रम शिंदे यांनी सांगितलं

**चार महिलांचा घेतला बळी :** तेंदूपत्ता संकलनाकरिता जंगलात गेलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यात येणाऱ्या गुंजेवाही गावातील एकूण चार महिलांवर वाघानं हल्ला करून त्यांना ठार मारलं होतं. सिंदेवाहीमधील गुंजेवाही गावातील जंगलात २२ मे रोजी ही दुर्दैवी घटना घडली. यानंतर वन विभागानं या वाघिणीला पकडण्याकरिता मोठे प्रयत्न केले. जंगलात ज्या भागात वाघीण होती, त्या भागात चार पिंजरे आणि २० ट्रॅप कॅमेरे लावण्यात आले. यासोबतच ती मोशन सेन्सर लाईव्ह सीसीटीव्ही कॅमेरे देखील लावण्यात आले होते.

वन विभागाच्या पथकानं २४ मे रोजी या वाघिणीला पकडण्यात यश मिळवलं. गोरेवाडा पार्क इथं या वाघिणीला नेलं जाणार असं सांगितलं जात होतं. मात्र असं असताना या वाघिणीला परतवाडा इथं आणण्यात आलं आहे. त्यामुळं आता या वाघिणीला मेळघाटच्या जंगलात सोडणार अशी चर्चा पसरली आहे.

**मेळघाटच्या जंगलात सोडणार वाघीण ? :** चंद्रपूर येथील या खूंखार वाघिणीला सध्या परतवाडा वन्यजीव विभागाच्या परिसरात आणण्यात आलं आहे. या वाघिणीला मेळघाटच्या जंगलात सोडलं जाणार असल्याचं बोललं जात आहे. अकोट वनपरिक्षेत्रांतर्गत वाघांची संख्या मोठ्या प्रमाणात असून या वाघिणीला गुगामल वन्यजीव विभागाअंतर्गत येणाऱ्या जंगलात सोडलं जाणार असल्याची देखील चर्चा आहे.

**अमरावतीत पकडलेला बिबटही परतवाड्यात :** दरम्यान दोन दिवसांपूर्वी अमरावती शहरातील रामपुरी कॅम्प परिसरात शिरलेल्या बिबट्याला देखील परतवाडा येथील वन्यजीव विभाग कार्यालय परिसरात रविवारी आणण्यात आलं आहे. या बिबट्याला देखील मेळघाटच्या जंगलात सोडलं जाणार असल्याचं सांगितलं जातं.

तिला कुठं ठेवायचं हे अद्याप ठरलं नाही : ठचंद्रपूर जिल्ह्यातील वाघिणीला सध्या परतवाडा इथं आणण्यात आलं आहे. या वाघिणीला काही दिवस परतवाडा येथेच ठेवलं जाणार आहे. तिला नेहमीसाठी कुठं ठेवायचं याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही,ठ असं वन्यजीव विभाग परतवाडा येथील सहाय्यक वनरक्षक विक्रम शिंदे यांनी स्पष्ट केले.

## महानगरपालिकेत अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



प्रतिनिधी १ जून

**अमरावती:** अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्य मा.महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते अहिल्यादेवी होळकर यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले.

यावेळी सभागृह नेता चेतन गावंडे, झोन सभापती इस्माईल कासम लालुवाले, नगरसेवक सचिन वैद्य, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, शिवा फुटाणे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## अचलपूर व परतवाडा येथे चार्ली मोबाईल पेट्रोलिंग दुचाकींचे वितरण

प्रतिनिधी १ जून

### आपत्कालीन प्रतिसाद व पोलिसिंग होणार अधिक प्रभावी



**अमरावती :** अमरावती ग्रामीण पोलीस दलाच्या कार्यक्षमतेत वाढ करून नागरिकांना अधिक जलद, प्रभावी व तत्पर पोलीस सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अमरावती ग्रामीण पोलीस घटकात ४ नवीन दुचाकी चार्ली मोबाईल पेट्रोलिंग वाहनांचा समावेश करण्यात आला आहे.

सदर चार्ली मोबाईल पेट्रोलिंग दुचाकी अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असून त्यामध्ये बॉडी-वॉर्न कॅमेरा (Bôd Came, सार्वजनिक सूचना प्रणाली PA System, वॉकी-टॉकी Walkie-Talkie, सायरन तसेच बीकन लाईट्स Bercon Lights यांचा समावेश आहे. या सुविधांमुळे पोलिसांना अधिक प्रभावी संवाद, तत्पर प्रतिसाद, पारदर्शक कारवाई आणि आपत्कालीन परिस्थितीत जलद हालचाल करणे शक्य होणार आहे. तसेच पोलीस प्रशासनाव्दारे सदर वाहनांचा वापर पुढीलप्रमाणे प्रभावीपणे करण्यात येणार आहे : दाट वस्ती व संवेदनशील भागात नियमित पेट्रोलिंग, महिलांच्या सुरक्षेसाठी गस्त व तत्पर प्रतिसाद., संशयास्पद हालचालींवर तात्काळ नियंत्रण. , रात्रीच्या वेळी अधिक प्रभावी गस्त घालणे, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जलद हालचाल, वाहतूक कोंडीच्या ठिकाणी त्वरित पोहोचून मदत, आपत्कालीन कॉलवर अल्पावधीत प्रतिसाद, गुन्हे प्रतिबंध व गुन्हेगारांवर प्रभावी नियंत्रण, नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक बळकट करणे, सार्वजनिक ठिकाणी पोलिसांची दृश्यमान उपस्थिती वाढविणे.

सदर दुचाकी वाहने निकेतन कदम भा.पो.से, पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांच्या हस्ते पोलीस स्टेशन परतवाडा येथे ३ व पोलीस स्टेशन अचलपूर येथे। असे एकूण ४ दुचाकी वाहनांचे वितरण करण्यात आले. सदर हस्तांतरण कार्यक्रमावेळी दत्ता तोटेवाड, अपर पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण, सागर भामरे (भा.पो.से), सहा. पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण, . अशोक लांडे प्रभारी पोलीस उप अधीक्षक (गृह) अमरावती ग्रामीण, संजय पवार पोलीस निरीक्षक मो.प.वि अमरावती ग्रामीण ईतर अधीकारी अंमलदार उपस्थित होते.

## चौराकुंड वन्यप्राणी मृत्यु प्रकरण तापले

### ◆ आरोपीच्या नातेवाईकांचा वन अधिकारी, कर्मचाऱ्यावर प्राणघातक हल्ला

जयकिसन इंगळे १ जून

**धारणी:** मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील सिपना वन्यजीव विभागाच्या चौराकुंड वन परीक्षेत्रा अंतर्गत उत्तर मालूर बीट परिसरात २२ मे रोजी तीन रानगवे, एक भेडकी आणि त्यानंतर आणखी एका रानगव्याचा मृतदेह आढळून आल्याने संपूर्ण वन विभागात खळबळ उडाली होती. पुढील तपासात माकडांसह एकूण आठ मोठ्या वन्यप्राण्यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची वाव समोर आली होती.या प्रकरणामागे विषप्रयोग, अवैध शिकार किंवा संगनमताने घातपात झाल्याचा संशय वन विभागाला होता.मृत प्राण्यांचे शवविच्छेदन करूनअवयव फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवून पाणवठ्यांचे नमुनेही तपासण्यात आले होते. या गंभीर प्रकरणाच्या तपासादरम्यान संशयित आरोपी अनील कास्देकर (वय २८,रा. चौराकुंड) याला वन विभागाच्या पथकाने गेल्या शनिवारी रात्री ताब्यात घेतले. सहायक वनसंरक्षक व्ही, एस. घाडगे, क्राईम सेलचे स्वप्नील राऊत,दिनेश कायंदे आणि इत्तर अधिकाऱ्यांच्याउपस्थितीतआरोपी ला चौकशीसाठीकोलकास विश्रामगृहाकडे नेण्यात आले. याच कारवाईचा संताप आरोपीच्या नातेवाईकांनी आणि समर्थकांनी वन कर्मचाऱ्यांवर काढल्याचे समोर आले आहे. वनपाल हर्षवर्धन उर्फ हर्षलमेळघाट व्याघ्र प्रकल्प परिसरातील चौराकुंड वन्यप्राणी मृत्यू प्रकरणाने आता अत्यंत गंभीर आणि हिंसक वळण घेतले असून आरोपीच्या अटकेनंतर संतप्त नातेवाईकांनी थेट वन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. वन विभागाच्या अधिकृत फिर्यादीत नमूद केल्यानुसार, चौराकुंड गावातील २० ते २५ जणांच्या जमावाने वनपरिक्षेत्र कार्यालय परिसरात घुसून दगडफेक करत सरकारी कर्मचाऱ्यांना लक्ष्य केले. या हल्ल्यात महिला वनरक्षक सुनीता बेठेकर गंभीर जखमी झाल्या असून त्यांचे डोके फुटल्याने मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाला.

शंकरराव सराटकर यांनी दि. ३१ मे रोजी धारणी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर काही वेळातच चौराकुंड गावातील महिला व पुरुषांचा जमाव वन विभागाच्या निवासस्थानाकडे धावत आला. त्यावेळी वनरक्षक मनीषा भुसुम, अनील चिकार, वर्षा बेलसरे, सुनीता बेठेकर व शुभम भुपेल्लीवार हे जीव वाचवण्यासाठी धावत होते. दरम्यान आरोपीची पत्नी शर्मिला अनील कास्देकर हिने हातातील दगड जोरात फेकून मारला. हा दगड महिला वनरक्षक सुनीता बेठेकर यांच्या डोक्यात लागून त्या रक्तबंबाळ झाल्या.

यानंतर संतप्त जमावाने वन विभागाच्या सरकारी निवासस्थानावर तुफान दगडफेक सुरू केली. सरकारी गणवेशातील कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करत जिवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या. फिर्यादी वनपाल हर्षवर्धन संतप्त जमाव शांत करण्यात धारणी पोलिसांना यशचौराकुंड येथे वन्यप्राणी मृत्यू प्रकरणानंतर निर्माण झालेली तणावपूर्ण परिस्थिती हाताळण्यात धारणी पोलीस विभागाने उल्लेखनीय कामगिरी बजावली.

## समाजाच्या शेवटच्या घटकाला सक्षम करण्याची प्रेरणा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून मिळते - यश खोडके

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंती दिनानिमित्त रहाटगाव येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी १ जून



**अमरावती :** भारतीय इतिहासात अनेक राजघराण्यांनी राज्य केले. अनेक साम्राज्ये उभी राहिली आणि काळाच्या ओघात लोप पावली. मात्र, काही व्यक्तिमत्वे अशी असतात की त्यांचे कार्य केवळ इतिहासापुरते मर्यादित राहत नाही, तर अनेक पिढ्या समाजाला दिशा देत राहते. लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर हे असेच एक तेजस्वी व्यक्तिमत्व होय. न्यायप्रियता, लोकाभिमुख प्रशासन, धर्मसंरक्षण, स्त्रीसन्मान आणि जनकल्याण या मूल्यांची त्यांनी घालून दिलेली परंपरा आजही तितकीच प्रेरणादायी आहे. असे प्रतिपादन यश खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले. रविवार ३१ मे २०२६ रोजी अमरावती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, रहाटगाव, अमरावती येथे आयोजित राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रत्येक महिलेला सन्मान, संधी आणि सामर्थ्य प्रदान करणाऱ्या लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे सर्वप्रथम यश सुलभा संजय खोडके यांच्या हस्ते पूजन - नमन - वंदन - माल्यार्पण करण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवीदेवी होळकर यांनी भारताच्या सांस्कृतिक एकात्मतेला नवी बळकटी दिली. जात, धर्म किंवा पंथ यांचा भेद न करता सर्वसामान्यांना आधार देण्याची त्यांची भूमिका आजच्या लोकशाही व्यवस्थेलाही मार्गदर्शक ठरावी, अशी आहे. स्त्री सक्षमीकरणाच्या क्षेत्रातही त्यांचे योगदान अद्वितीय आहे. त्यांच्या लोककल्याणकारी सुशासनाचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवीणे आणि त्यांचे विचार समाजमनात रुजवीणे, हेच आपल्या सर्वांचे सामूहिक कर्तव्य आहे. ही भावना जोपासित रहागाव मित्र परिवार च्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंती दिनाचे औचित्य साधून यावेळी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी रक्तदान शिबीर स्थळी भेट देऊन यश खोडके यांनी या अभिनव उपक्रमाची प्रशंसा केली.' रक्तदान म्हणजेच सर्वश्रेष्ठ दान ' या शब्द पंक्तीकडे लक्ष वेधित आयोजकांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन यावेळी स्थानिक युवक - युवतीनीं तसेच आमंत्रित सदस्यांनी स्वेच्छा रक्तदान करीत आपल्या सामाजिक दायित्वाचा सर्व उपस्थितांना परिचय करून दिला. गरजू रुग्ण असो किंवा आपत्कालीन परिस्थिती अशावेळी त्यांना आवश्यक गटाचे रक्त तात्काळ उपलब्ध व्हावे, हा उद्देश नजरेसमोर ठेवून आयोजकांनी पुढाकार घेऊन केलेले प्रयास कार्य हे निश्चितच प्रेरणादायी व अनुकरणीय आहे.

## चांदूर रेल्वे पोलिसांची गावठी दारू हातभट्टीवर धडक कारवाई

प्रतिनिधी १ जून



**अमरावती :** ३१/०५/२०२६ रोजी पोलीस स्टेशन चांदूर रेल्वे पोलिस यांनी ग्राम गौरखेडा येथील पारधी बेड्यावर गिरीश सुभाष पवार हा त्याच्या इतर साथीदारसह मोहाच्या सडवा व इतर रासायनिक पदार्थ पासून अवैधरित्या गावठी दारू निर्मिती करीत आहे.

सदर माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन चांदूर रेल्वेच्या पो नि अजय आकरे यांच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाड टाकून कारवाई केली. कारवाईदरम्यान मोहाचा सडवा भरलेले प्रत्येकी २०० लिटर क्षमतेचे ३२ प्लास्टीक ड्रम व २०० लिटर क्षमतेचे १० लोखंडी ड्रम मोहाचा सडवा भरून आढळून आले. एकूण ८४००० लिटर मोहाचा सडवा किंमत अंदाजे ८,४०,००० /- रु जागीच नष्ट करण्यात आला. घटनास्थळावरून दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे नवसागर, गूळ तसेच लोखंडी पिपे, टोपली, कढई, पाइप व इतर आरोगयास अपायकारक द्रव्य असा एकूण ९,८८,८०० किंमत चा मुद्देमाल जप्त / नष्ट करण्यात आले आहे.

या प्रकरणी भट्टी मालक गिरीश सुभाष पवार (वय ४२ वर्षे), रा. गौरखेडा, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (फ), (क), (ड) तसेच बी. एन. एस. कलम १२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलिस अधीक्षक सा. दत्ता तोटेवाड, SDPO चाँदूर रेल्वे अशोक थोरात सा, पोलीस निरीक्षक चाँदूर रेल्वे, अजय आकरे यांच्या मार्गदर्शनामध्ये पोउपनि नीतेश आझाडे, पोउपनि रोहित कुदळे, पोहेका शिवाजी घुगे १५२७, राहुल १८५५, योगेश १६५२, अतुल २०५७, योगेश डड१८०७, रवी ३३६ पोका संदीप ७४४, पोका सागर ब न ४०, पोका संदीप ११, पो का ऋषिकेश १८०५, शुभम ब न ६१५, स्वप्नील ब न ७०८, नीलेश ब न १४७१, कुमार ९६१ मपोका निकिता ५८९ यांनी केली. पुढील तपास पोलीस स्टेशन चांदुर रेल्वे करीत आहे.

## अमरावती जिल्हा परिषदेतील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या 'या' वादग्रस्त आदेशामागचे नेमके गौडबंगाल काय?

प्रतिनिधी १ जून

**धारणी:** अमरावती जिल्हा परिषदे अंतर्गत एकूण १४ पंचायत समित्यांपैकी तब्बल ७ पंचायत समित्यांमध्ये गटविकास अधिकाऱ्यांची (BDO) पदे रिक्त असल्याने अतिरिक्त प्रभार सोपवून कारभार हाकला जात आहे.

मात्र, हे प्रभार सोपवताना मुख कार्यकारी अधिकारी (CEO) सत्यम गांधी यांनी घेतलेले निर्णय प्रशासकीय सुसूत्रता आणि शासकीय परिपत्रकातील नियमांना हरताळ फासणारे का ठरत आहेत, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. या संपूर्ण प्रकरणावरून खालील गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

शासनाच्या परिपत्रकानुसार, एखाद्या पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी (BDO) पद रिक्त असल्यास किंवा ते रजेवर असल्यास, तेथे कार्यरत असलेल्या 'नियमित सहाय्यक गटविकास अधिकाऱ्याकडेच' (ABDO) तो प्रभार सोपवणे आवश्यक आहे. असे असतानाही, स्थानिक पातळीवर अनुभवी व नियमित सहाय्यक गटविकास अधिकारी उपलब्ध असताना त्यांना डावलून इतर तालुक्यांच्या अधिकाऱ्यांना अतिरिक्त प्रभार देण्यामागे नेमका काय हेतू आहे?

येथे स्थानिक परिस्थितीचा १५ ते २० वर्षांचा दांडगा अनुभव असलेले सीडाम (नियमित ABDO) यांच्याकडे गटविकास अधिकाऱ्याचा प्रभार असताना, तो काढून घेऊन प्रशासनाचा कोणताही अनुभव नसलेले व नव्यानेच रुजू झालेले दर्यापूरचे ABDO कावळे यांना धारणीचा प्रभार का देण्यात आला?

**अचलपूर व अंजनगाव सुर्जी**

अचलपूर येथे कल्पना जायभाय या नियमित ABDO म्हणून कार्यरत असून त्यांना एक वर्षापेक्षा जास्त काळ प्रभारी BDO म्हणून काम करण्याचा उत्तम अनुभव आहे. असे असताना, अंजनगाव सुर्जी येथे नव्याने रुजू झालेले आणि प्रशासकीय अनुभव नसलेले डापके यांच्याकडे अचलपूरचा प्रभार सोपवण्याचा अजब तर्क काय?

**भातकुली पंचायत समिती**

भातकुली येथे प्रवीण वानखेडे हे नियमित सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून कार्यरत असून त्यांनी यापूर्वी प्रदीर्घ काळ प्रभारी BDO म्हणून यशस्वी काम सांभाळले आहे. त्यांना डावलून धामणगावचे BDO श्री. प्रफुल्ल बोरखडे यांच्याकडे भातकुलीचा अतिरिक्त प्रभार का सोपवण्यात आला?

**भौगोलिक अंतराचा विसर आणि कामकाजाचा बोजवारा**

गटविकास अधिकाऱ्याने पंचायत समिती स्तरावर पूर्णवेळ उपस्थित राहून कामकाज सुरळीत चालवणे अपेक्षित असते. मात्र, दर्यापूर ते धारणी हे अंतर अंदाजे २०० किलोमीटर आणि तिवसा ते दर्यापूर हे अंतर अंदाजे १०० किलोमीटर आहे. एवढ्या प्रचंड अंतरावर एकाच अधिकाऱ्याने दोन-दोन पंचायत समित्यांचा गाडा हाकणे व्यावहारिकदृष्ट्या कसे शक्य आहे? या दोन ते तीन तालुक्यांच्या फेऱ्यांमध्येच अधिकाऱ्यांचा वेळ जात असल्याने दोन्ही ठिकाणच्या ग्रामीण विकासकामांचा आणि सामान्य जनतेच्या कामांचा बोजवारा उडाला

> जिल्हा परिषदेच्या प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या चुकिच्या निर्णयाचा फटका अतिदुर्गम भागातील आदिवासींना सहन करवा लागत असल्यामुळे जनता त्रस्त झाली आहे.
>
> **अशोक मावस्कर,**
> माजी सभापती, पंचायत समिती धारणी

नाही का स्थानिक पातळीवर १५-२० वर्षांचा अनुभव असलेले आणि नियमानुसार पात्र असणारे नियमित सहाय्यक गटविकास अधिकारी (ABDO) उपलब्ध असताना, त्यांना जाणीवपूर्वक डावलून १०० ते २०० किमी अंतरावरील इतर तालुक्यातील किंवा नवख्या अधिकाऱ्यांना अतिरिक्त प्रभार देण्याचे अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्या आदेशांचे नेमके 'प्रशासकीय लॉजिक' काय? या विसंगत निर्णयामांमागे नक्की कोणती अदृश्य शक्ती कार्यरत आहे आणि यामुळे विस्कळीत झालेल्या ग्रामीण प्रशासनाला वाली कोण?

# सुरेशभाऊ मापारी वाढदिवस विशेष...








वय वर्ष फक्त १७. मतदानाचा हक्कही मिळाला नव्हता. तारुण्यात समाजकारणासोबत राजकारणात पदार्पण करणाऱ्या या वयातील मुलांमध्ये महाविद्यालयाच्या वातावरणाची झिंग, चित्रपट व प्रेमाची वेगळीच धुंदी असताना शिवसेनेच्या विचारांच्या प्रेमात पडलेला एक तरुण जो स्व. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जहाल व प्रखर देशभक्तीपर विचारानी भारावलेला वयाच्या १७ व्यावर्षी आपले गाव धानोरा मापारी येथे शिवसेनेची शाखा स्थापन करण्याचे ठरवितो, तो तरुण म्हणजे शिवसेना माजी जिल्हाप्रमुख बांधकाम सभापती सुरेशभाऊ मापारी. काळ १९९०-९१ चा असेल. सुरेश मापारी या तरुणाने गावात शिवसेनेची शाखा स्थापन करण्याचे ठरविले. तत्कालीन शिवसेना नेते गुलाबराव गावंडे, झिंग्राजी महाले, केशवराव चव्हाणसह अन्य नेत्यांच्या उपस्थितीत शिवसेनेची शाखा स्थापन केली. शिवसेना पक्ष नव्हे तर एक विचार म्हणून काम करण्यास सुरुवात केली. ग्रामीण भागातील अतिसामान्य शेतकरी कुटूंबातील तरुणाचा राजकिय प्रवास. गावातील छोटीमोठी कामे मार्गी लावण्याच्या स्वभावामुळे वयाच्या केवळ २१ व्या वर्षी ग्रामस्थांनी त्यांना ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडूण दिले. सरपंच ,पंचायत समिती सदस्य , जि.प. सदस्य, बाजार समितीचे उपसभापती मुख्यप्रशासक ते बांधकाम सभापती पदाचे कारकीर्त जबाबदारीने संभाळत आहेत. स्व: कर्तृत्वावर निर्माण झालेल्या नेतृत्वाने शेकडो कार्यकर्त्यांना घडविले आहे. बाजार समितीत अनेक वेळा सत्ता स्थापन करतांना पुढाकार घेतला. तुकाराम काकडे, बालाजी वानखेडे, यांना पंचायतीचे सभापती बनविले. जि.प. सदस्य पदावर गांडांतर आले असतांना रातोरात उच्च न्यायालयात याचिका दाखल करून सदस्य पदाच्या रद्दतेवर स्थगिती आणून हातोहात जिल्हा परिषद बांधकाम सभापती झाले. आश्चर्य कारक घटनांमुळे सर्वच जण अचबीत झाले. त्यांच्या स्व; कर्तृत्वामुळे नेतृत्वात वाढ झाली आहे. मात्र राजकारणात त्यांना अनेक विरोधालाही सामोरे जावे लागले त्यामुळे आता त्यांनी भाजप प्रवेश केला आहे. असे कतृत्ववान नेतृत्व म्हणजे...

**सुरेश मापारी**

## स्व:कर्तृत्व उभारलेलं नेतृत्व..!

## लयभारी ,सुरेश मापारी

ग्रामपंचायत सदस्यानंतर दुसऱ्या पाच वर्षात सरपंच त्यानंतर सतत २५ वर्षे ग्रामपंचायतीवर वर्चस्व ठेवले .पं.स. सदस्य, वाशिम कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक, जि.प. सदस्य, कृ.उ.बा. स. उपसभापती तसेच बाजार समिती मुख्यप्रशासक जि.प. बांधकाम सभापती व शिवसेना जिल्हा प्रमुख आता भारतीय जनता पार्टीत शेकडो कार्यकर्त्यांसह प्रवेश असा सुरेशभाऊ मापारी यांचा राजकिय प्रवास, कुठलाही राजकिय वारसा नसतांना अतिसामान्य कुटूंबातील सुरेशभाऊंनी सहकार क्षेत्रातही ठसा उमटविला. जि.प. तसेच बाजार समितीमध्ये निवडूण आले. पं.स. व जि.प. मध्ये सदस्यपदी असतांना त्यांनी अनेक विकासकामे मार्गी लावली. प्रत्येक राजकिय पक्षाचा एक विचार व स्वभाव असतो. समाजसेवेने झपाटलेल्या सुरेशभाऊंना परिणामाची चिंता नसल्याचा सुरेशभाऊ म्हणजे चपलक बसणारे नेतृत्व. सुरेशभाऊ म्हणजे वेगळच रसायनं. कोणालाही नेहमी मदत करण्याची उदारता त्यांच्यात आहे. जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती पद सांभाळण्यापासून वाशीम तालुक्यासह जिल्ह्यात शेकडो कोटीची विकास कामे केली. तर उकळी पेन जिल्हा परिषद सर्कलसह जिल्ह्यातील इतर सर्कलमध्ये शेकडो कोटी रूपयाचे विकास कामे केली. त्यांच्या विकास कामाने वाशीम तालुक्यासह उकळीपेन सर्कलचा चेहरा मोहरा बदलत आहे. सतत कार्यरत राहणाऱ्या सुरेशभाऊंमध्ये राजकारणातील धुर्तपणा नाही. सरळसोट स्वभावामुळे डावपेचाचे राजकारण त्यांनी कधी केले नाही. समाज कार्यातून राजकारण करतांना कार्यकर्त्यांना सोबत ठेवून गोरगरीबांची सेवा करतात. मुर्तीमंत उदाहरण असणाऱ्या आदरणीय सुरेशभाऊ मापारी यांना वाढदिवसानिमित्त अनंत शुभेच्छा.






## कार्यकर्त्यांना साथ...

ग्रा.पं. सदस्य, सरपंच ,पं.स. सदस्य , जि.प. सदस्य, बाजार समितीचे उपसभापती मुख्यप्रशासक ते बांधकाम सभापती पदाचे कारकीर्त जबाबदारीने संभाळत आहेत. स्व: कर्तृत्वावर निर्माण झालेल्या नेतृत्वाने शेकडो कार्यकर्त्यांना घडविले आहे. बाजार समितीत अनेक वेळा सत्ता स्थापन करतांना पुढाकार घेतला. तुकाराम काकडे, बालाजी वानखेडे, यांना पंचायतीचे सभापती बनविले. जि.प. सदस्य पदावर गांडांतर आले असतांना रातोरात उच्च न्यायालयात याचिका दाखल करून सदस्य पदाच्या रद्दतेवर स्थगिती आणून हातोहात जिल्हा परिषद बांधकाम सभापती झाले. आश्चर्य कारक घटनांमुळे सर्वच जण अचबीत झाले. त्यांच्या स्व; कर्तृत्वामुळे नेतृत्वात वाढ झाली आहे. मात्र राजकारणात त्यांना अनेक विरोधालाही सामोरे जावे लागत आहे. असे कतृत्ववान नेतृत्व म्हणजे...

## मापारीच्या एन्ट्रीने भाजपचा बोलबाला...

# ग्रामीण भागाचे धोरण अन् राजकारण, बदलणार समिकरण !

## मापारीच्या संघटन कौशल्याचा भाजपला फायदा

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

वाशीम जिल्हा परिषदेचे माजी सभापती तथा शिवसेना उबाठाचे माजी जिल्हाप्रमुख सुरेश मापारी यांनी नुकताच मुंबईत भाजपचे प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण यांचे उपस्थितीत भाजप मध्ये त्यांच्या शेकडो समर्थकांसह प्रवेश घेतला. मापारी यांच्या भाजप एन्ट्रीने वाशीम जिल्ह्यातील ग्रामिण भागातील सत्तेची समिकरणे बदलणार असून येत्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणूकीत सुरेश मापारी यांच्या संघटन कौशल्याने भाजपचा बोलबाला राहणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

सुरेश मापारी यांनी मागील दहा वर्षात आपल्या संघटन कौशल्याने वाशीम जिल्ह्यातील ग्रामिण भागासह शहरी भागातही हजारो कार्यकर्त्यांची फळी निर्माण केली आहे.मागील लोकसभा निवडणूकीत मापारींच्या समर्थकांसह त्यांच्या चाहत्यांनी यवतमाळ-वाशीम लोकसभा मतदार संघात महाविकास आघाडीच्या उमेदवाराला वाशीम जिल्ह्यातील वाशीम आणि कारंजा लाड विधानसभा मतदार संघात मताधिक्य मिळवून दिल्याने खासदार संजय देशमुख यांचा विजय झाल्याचे सर्वश्रृत आहे.त्यानंतर वाशीम विधानसभा निवडणूकीच्या वेळी मापारी यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारास निवडूण आणण्यासाठी केलेले अथक प्रयत्नसुद्धा सर्वांना माहितच आहे. सुरेश मापारी यांचा वाशीम तालुक्यातच नव्हेतर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील



ग्रामिण भागात दांडगा जनसंपर्क आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीसह सहकार क्षेत्रातील वाशीम बाजार समितीच्या निवडणूकीत त्यांच्या संघटन कौशल्याचे चांगले रिझल्ट आल्याचेही सर्वांना माहितच आहे. दोन महिन्यापुर्वी पार पडलेल्या अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूकीत वाशीम तालुक्यातून सहकार क्षेत्रात प्रथमच निवडणूक लढविणारे धनंजय गोरे यांच्या विरोधात उभे असलेले सहकार व राजकारणात मातब्बर असलेले अनुभवी उमेदवार चक्रधर गोटे यांचा पराभव करून नवख्या धनंजय गोरे यांचा मताधिक्याने झालेला विजय हा सुद्धा मापारींच्या कौशल्याचा दाखला आहे. वाशीम पालिकेच्या निवडणूकीतही त्यांचे परिश्रम वाखाणण्याजोगे आहेत.सुरेश मापारी यांच्या चांगल्या स्वभावामुळे त्यांचे वाशीम जिल्ह्यात हजारो चाहते आहेत.त्यांच्या समर्थकांमध्ये विविध राजकीय व प्रादेशिक पक्षाचे आजी,माजी पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्त्यांचा समावेश आहे.आगामी वाशीम जिल्हा परिषद, पंचायत समितीसह जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत सुरेश मापारी यांच्या भाजप एन्ट्रीचा आणि त्यांच्या संघटन कौशल्याचा भाजपला मोठ्या प्रमाणात फायदा होणार असल्याने वाशीम जिल्ह्यात फक्त भाजपचा बोलबाला राहणार असल्याची राजकीय जाणकारांमध्ये चर्चा आहे.















## विकासाची 'सुरेश -रेखा' !

धानोरा मापारी गावातून जन्मलेल्या सुरेश मापारी यांचा रेखाताईशी शुभविवाह झाल्यानंतर त्यांच्या जीवनाला कलाटनी मिळाली. राजकारण करीत असतांना सामाजिक कार्याची जोड देत रेखाताईने सुरेश भाऊना साथ देत परिवाराची गोडी कायम ठेवत या जोडीने सामाजिक व राजकीय कामाचा धडका लावला. ग्रामपंचायतीपासून तर पंचायत समिती सदस्यत्व , जिल्हा परिषद सदस्यत्व , कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती , मुख्यप्रशासक व आता शिवसेनेच्या जिल्हाप्रमुख पदासोबतच जिल्हा परिषदच्या बांधकाम सभापती पदाची कारकीर्त विकासाची भरारी घेत आहे. सुरेशभाऊंना कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसतांना वय वर्ष फक्त १७. मतदानाचा हक्कही मिळाला नव्हता. तारुण्यात पदार्पण करणाऱ्या या वयातील मुलांमध्ये महाविद्यालयाच्या वातावरणाची झिंग, चित्रपट व प्रेमाची वेगळीच धुंदी असताना शिवसेनेच्या विचारांच्या प्रेमात पडलेला एक तरुण जो स्व. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जहाल व प्रखर देशभक्तीपर विचारानी भारावलेला वयाच्या १७ व्यावर्षी आपले गाव धानोरा मापारी येथे शिवसेनेची शाखा स्थापन करण्याचे ठरवितो, तो तरुण



म्हणजे आजचे शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेशभाऊ मापारी. काळ १९९०-९१ चा असेल. सुरेश मापारी या तरुणाने गावात शिवसेनेची शाखा स्थापन करण्याचे ठरविले. तत्कालीन शिवसेना नेते गुलाबराव गावंडे, झिंग्राजी महाले, केशवराव चव्हाणसह अन्य नेत्यांच्या उपस्थितीत शिवसेनेची शाखा स्थापन केली. शिवसेना पक्ष नव्हे तर एक विचार म्हणून काम करण्यास सुरुवात केली. ग्रामीण भागातील अतिसामान्य शेतकरी कुटूंबातील तरुणाचा राजकिय प्रवास. गावातील छोटीमोठी कामे मार्गी लावण्याच्या स्वभावामुळे वयाच्या केवळ २१ व्या वर्षी ग्रामस्थांनी त्यांना ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडूण माजी मुख्यमंत्री मा. उध्दव ठाकरे व तत्कालीन पालकमंत्री शंभुराज देसाई यांच्या पुढाकाराने वाशीम तालुक्यात १२० कोटीचे तर उकळीपेन सर्कलमध्ये ३९ कोटीचे विकास कामे केली. यशस्वी पुरूषांच्या पाठीशी त्यांच्या पत्नी असते त्याच प्रमाणे सुरेश भाऊंच्या प्रत्येक कार्यात घर व संसार संभाळत रेखाताईनी सामाजिक व राजकीय धुरा संभाळायला सुरेश भाऊंना बरोबरीची साथ दिली. रेखाताईमुळेच वाशीम तालुक्यात सह उकळीपेन जि.प. सर्कलमध्ये विकास कामाची खऱ्या अर्थाने 'सुरेश -रेखा' निर्माण झाली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
सोमवार, दि. १ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**सिंदखेडराजा :** आज ३१ मे रोजी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती सिंदखेड राजा नगरपालिकेच्या वतीने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याला अभिवादन करून त्यांच्या आदर्श प्रशासन, समाजसेवा आणि न्यायप्रिय राज्यकारभाराचा गौरव केला. या कार्यक्रमास नगरसेवक कृष्णा मेहेत्रे, दिलीप आढाव, ॲड. संदीप मेहेत्रे, नरहरी तायडे, कैलास म्हस्के, संतोष मेहेत्रे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते योगेश म्हस्के, उमेश खरात, रामदास बारवकर, ओम भुसारे, दीपक ठाकरे, नागेश कुरंगळ, तसेच नगरपरिषद कर्मचारी गणेश मापारी, पदाधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या न्यायप्रिय प्रशासन, जनकल्याणकारी योजना आणि धार्मिक स्थळांच्या विकासकार्याबाबत उपस्थित मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. (श.प्र)

# वादळी पावसाचा फटका; केळी - संत्रा बागांचे नुकसान

## ◆ अवघ्या तासाभराच्या पावसाने उभे पीक जमीनदोस्त

प्रतिनिधी १ जून

**जळगाव जामोद:** रोहिणी नक्षत्र सुरू असताना रविवारी (३१ मे) सकाळी वादळवाऱ्यासह मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली. अचानक झालेल्या पावसामुळे तालुक्यातील तुळजा तरोडा, सुनगाव, जामोद व परिसरातील केळी व संत्रा बागांचे नुकसान झाले. अवघ्या एका तासाच्या थैमानात अनेक केळीच्या बागा जमीनदोस्त झाल्या, तर संत्रा बागांमध्ये फळगळ झाली.

रविवारी सकाळच्या सुमारास अचानक काळे ढग दाटून आले आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाने परिसराला झोडपून काढले. रोहिणी नक्षत्राच्या शेवटच्या टप्प्यात आलेल्या या वादळामुळे काढणीसाठी तयार असलेली केळीची झाडे खोडासह मोडून पडली. अनेक ठिकाणी घडांसह झाडे कोसळल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी सहा ते सात महिने मेहनत घेऊन जोपासलेल्या बागा काही क्षणांत उद्ध्वस्त झाल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. केळीबरोबरच संत्रा बागांनाही वादळी वाऱ्याचा फटका बसला असून मोठ्या प्रमाणात फळगळ झाल्याचे सांगण्यात येत आहे.



**मदतीची अपेक्षा**
नुकसानग्रस्त भागात तातडीने महसूल व कृषी विभागाने संयुक्त पाहणी करून पंचनामे करावेत, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. केळी व संत्रा उत्पादकांना विशेष आर्थिक मदत देण्याबरोबरच पीक विम्याचे दावे तत्काळ मंजूर करावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शासकीय मदत मिळाल्यास काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो, असे शेतकरी सांगत आहेत.

**पीक उद्ध्वस्त !**
शेतकऱ्यांच्या केळी बागा काढणीसाठी सज्ज होत्या. काही दिवसांतच बाजारात माल विक्रीसाठी जाणार असताना वादळी वाऱ्याने घडांसह झाडे जमीनदोस्त झाली. त्यामुळे अपेक्षित उत्पन्नावर पाणी फिरले असून, शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# पिंपळगाव राजात खरीपपूर्व नियोजन कार्यशाळा उत्साहात

## शेतकऱ्यांना महाविस्तार एआय ॲपबाबत मार्गदर्शन

प्रतिनिधी १ जून

**खामगाव:** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी पिंपळगाव राजा येथे ग्रामपंचायत कार्यालयात खरीप पूर्व नियोजन कार्यशाळा शनिवारी पार पडली. जळगाव जामोद येथील कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ प्रा. शशांक दाते तसेच तालुका कृषी अधिकारी कार्यालयांतर्गत सहायक कृषी अधिकारी सुचिता घुले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा घेण्यात आली.

खरीप हंगाम अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने कृषी विभागाकडून शेतकऱ्यांमध्ये पेरणीपूर्व जनजागृती केली जात आहे. या कार्यशाळेत बियाण्यांची उगवण क्षमता तपासण्याची पद्धत, बीज प्रक्रियेचे महत्त्व, खतांचा संतुलित वापर, रुंद सरी-वरंबा पद्धतीने पेरणी, शून्य मशागत तंत्रज्ञानाचा वापर तसेच हुमणी अळी नियंत्रणाबाबत सविस्तर आले. मार्गदर्शन करण्यात आले, यावेळी प्रा. दाते यांनी शेतकऱ्यांना महाविस्तार एआय ॲपची सविस्तर माहिती दिली. कार्यशाळेला सरपंच शेख शाकीर शेख चांद, जुलकर शेख चांद, वसंत तेलंग, श्रीकृष्ण सरदार, मंगेश दसरकर, गजानन भातुरकर, संदीप बोदडे, प्रकाश साटोटे, राजाराम तेलंग, प्रकाश तेलंग, सचिन मोरे, विजय सावरकर, शैलेंद्र इंगळे, जयश्री क्षीरसागर, ज्योती सातव, सिंधू वानखडे आदींसह गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

# सहसंमतीने ठेवलेल्या संबंधांचे गुपचूप चित्रीकरण करून तरुणीची बदनामी

## ◆ मलकापूर शहरातील तरुणावर गुन्हा दाखल

प्रतिनिधी १ जून

**मलकापुर:** प्रेमसंबंधादरम्यान सहसंमतीने ठेवलेल्या शारीरिक संबंधांचे गुपचूप व्हिडिओ चित्रीकरण (गुप्त रेकॉर्डिंग) करून, ते सोशल मीडियावरून प्रसारित करत तरुणीची बदनामी आणि विनयभंग केल्याची धक्कादायक घटना मलकापूर शहरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात एका २६ वर्षीय तरुणाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**दोघांमध्ये होते प्रेमसंबंध**

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मलकापुर परिसरातील रहिवासी असलेल्या २५ वर्षीय पीडित तरुणीचे आणि रोहिदास नगर येथील संशयित आरोपी अविनाश रोहिदास धामोणे (वय २६) याचे एकमेकांशी ओळखीतून प्रेमसंबंध निर्माण झाले होते. या प्रेमसंबंधादरम्यान दोघांनी परस्पर सहमतीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले होते.

**व्हिडिओ रेकॉर्डिंग करून केली बदनामी**
शारीरिक संबंधादरम्यान संशयित आरोपी अविनाश धामोणे याने पीडित तरुणीच्या नकळत (गुपचूप) मोबाईलवर अश्लील व्हिडिओ रेकॉर्डिंग केले. त्यानंतर संशयिताने हे अश्लील व्हिडिओ तरुणीच्या व्हॉट्सॲपवर आणि इतरत्र प्रसारित केले. पीडितेच्या संमतीशिवाय हे चित्रीकरण करून ते व्हायरल केल्यामुळे तिची मोठी सामाजिक व कौटुंबिक बदनामी झाली. तसेच आरोपीने तिचा विनयभंग केला.

**पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

या जाचाला कंटाळून पीडित तरुणीने मलकापूर शहर पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली. तरुणीच्या तोंडी रिपोर्टवरून पोलिसांनी संशयित आरोपी अविनाश रोहिदास धामोणे याच्याविरुद्ध अप.नं. ४१३/२६ भारतीय न्याय संहिता (BNS) च्या कलम ७४, ७७ आणि ३५६(४) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

सदर गुन्हा ३० मे २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास दाखल करण्यात आला असून पो.हे.कॉ मोहम्मद रिजवान यांनी प्राथमिक कागदपत्रे घेतली. मलकापूर शहर पोलीस स्टेशन चे पो. नि.गणेश गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पो.उप.नि सतीश बेले करीत आहेत.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून व्हिडिओ केला व्हायरल; चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

## आरोपींनी धमकी देऊन संबंधासाठी केले ब्लॅकमेल

प्रतिनिधी १ जून

**खामगाव :** तालुक्यातील एका गावात एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिचा अश्लील व्हिडिओ तयार करून सोशल व्हायरल करण्याची धमकी पोलिसांनी चारही आरोपींविरुद्ध 'पोक्सो' आणि 'ॲट्रॉसिटी' अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ मे रोजी पीडित मुलगी एका पिठाच्या गिरणीवर दळण घेण्यासाठी गेली होती. तिथे दबा धरून बसलेल्या किसना उर्फ सुमित मुंढे याने पीडितेचे हात पकडून बळजबरीने तिच्यावर अत्याचार केला.

या घृणास्पद कृत्यादरम्यान तिथे उपस्थित असलेले त्याचे इतर साथीदार दादू उर्फ कुलदीप कवळकार, अजय उर्फ सुदर्शन बघे आणि ऋतिक सोळंके यांनी मोबाइलवर व्हिडिओ तयार केला. त्यानंतर आरोपींनी तो व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन पीडितेवर दबाव आणला व शारीरिक संबंधांसाठी ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. दरम्यान, २८ मे रोजी पीडितेच्या चुलत भावाने त्याच्या मोबाइलवर आलेला तो व्हिडिओ पीडितेच्या आईला दाखवला. या धक्कादायक प्रकारामुळे कुटुंबाला मोठा धक्का बसला. मात्र, आई-वडील आणि नातेवाइकांनी पीडितेला धीर दिल्यानंतर पोलिस स्टेशन गाठून तक्रार दिली.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ६४ (१), ६५(१), ७५, ३५१ (२) (३), ३ (५); पोक्सो कायदा कलम ४, ८, १२; ॲट्रॉसिटी कायदा आणि माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (इ), ६७अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील करत आहेत.

# शिरविरहित मृतदेहप्रकरणी चार पथकांची नियुक्ती!

## नव्याने तपासः विविध अंगांनी चौकशी सुरू!

प्रतिनिधी १ जून

**जळगाव जामोदः** तालुक्यातील राजुरा शिवारात आढळून आलेल्या शिरविरहित मृतदेह प्रकरणात पोलिसांनी नव्याने तपास सुरू करत, चार विशेष पथकांची नियुक्ती केली आहे. मृतदेहाची ओळख पटविणे, तांत्रिक माहितीचे विश्लेषण, घटनास्थळाशी संबंधित पुराव्यांची तपासणी आणि विविध जिल्ह्यांतील बेपत्ता व्यक्तींची माहिती पडताळणे, अशा वेगवेगळ्या जबाबदाऱ्या या पथकांवर सोपविण्यात आल्या आहेत.

या प्रकरणाचा तपास मेहकरचे उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खाडे यांच्याकडे सोपविण्यात आल्यानंतर तपासाची दिशा बदलण्यात आली आहे. सुरुवातीच्या तपासातील त्रुटी समोर आल्यानंतर आता उपलब्ध सर्व पुरावे आणि कागदपत्रांची नव्याने छाननी केली जात आहे. पोलिसांनी या प्रकरणात कोणतीही शक्यता नाकारलेली नसून सर्व बाजूंनी तपास सुरू असल्याचे सांगितले आहे. तपासादरम्यान मोबाइल कॉल डिटेल रेकॉर्ड, लोकेशन डेटा, सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक माहितीची पडताळणी सुरू आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी चार स्वतंत्र पथके तयार करण्यात आली आहेत. तांत्रिक तपासासह विविध अंगांनी चौकशी सुरू आहे. मृतदेहाची ओळख पटविणे आणि घटनेमागील वस्तुस्थिती समोर आणणे, यावर आमचा भर आहे.

**एसडीपीओ, मेहकर**

# महिलेची आत्महत्या

**खामगावः** तालुक्यातील पिंप्री गवळी येथे ३६ वर्षीय विवाहित महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ३१ मेच्या पहाटे उघडकीस आली आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून, याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. प्रज्ञा राजू पाचपोर (वय ३६, रा. पिंप्री गवळी, ता. खामगाव) असे मृत महिलेचे नाव आहे. याप्रकरणी त्यांचे पती राजू रतन पाचपोर (वय ४६) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, प्रज्ञा पाचपोर यांच्यावर काही काळापासून उपचार सुरू होते. प्राथमिक माहितीनुसार, आजारपणामुळे आलेल्या नैराश्यातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले असावे, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण तपासानंतर स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली.

# हजारो रुग्णांचे आधारवड सूरज यादव 'प्रदेश उपाध्यक्ष' पदी

प्रतिनिधी १ जून

खामगाव: येथील एकनिष्ठा गौ सेवा रक्तसेवा फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष समाजसेवेच्या क्षेत्रात निस्वार्थ भावनेने झटणारे व महाराष्ट्रातील सुपरिचित रूग्णसेवक, गौसेवक सूरज शिवमुरत यादव यांची 'महाराष्ट्र राज्य रुग्णसेवक व श्रमिक कामगार संघटना' च्या प्रदेश उपाध्यक्ष पदी दि. ३०/०५/२०२६


रोजी नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रविण समाधान भोटकर यांनी श्री. यादव यांच्या रुग्णसेवेची व निष्ठेची दखल घेत ही महत्त्वपूर्ण व सन्मानाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे. ङचौदा वर्षांचा अनुभव सूरज यादव यांनी यापूर्वी आदि सहा वर्ष बुलढाणा जिल्हाध्यक्ष म्हणून संघटनेची जबाबदारी अत्यंत निष्ठेने व यशस्वीपणे पार पाडली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली बुलढाणा जिल्ह्यात संघटनेचा मोठा विस्तार झाला असून, शेकडो नवीन कार्यकर्ते संघटनेत जोडले गेले. मूळ खामगाव, जि. बुलढाणा येथील सूरज यादव यांनी आजपर्यंत हजारो गोरगरीब, गरजू, दिव्यांग, थॅलेसिमिया, किडनी आजार, कॅन्सरग्रस्त, हृदयविकार व गंभीर आजारांनी त्रस्त रुग्णांना मोफत औषधी आर्थिक मदत तसेच रक्त उपलब्ध करून दिले आहे. तसेच, असंख्य गरजूंना शासकीय योजनांचा लाभ, मुख्यमंत्री सहायता निधी, अपंग प्रमाणपत्र, मोफत उपचार व रुग्णवाहिका सेवा मिळवून देण्यासाठी त्यांनी स्वतः रात्रंदिवस धावपळ केली आहे. 'सेवा परमो धर्मः' या ब्रीदवाक्यानुसार ते अहोरात्र रुग्णसेवेत व गौसेवेत झटत असून, त्यांना 'रुग्णांचे आधारवड' व 'संकटकाळातील देवदूत' म्हणून ओळखले जाते. निवडीनंतर प्रतिक्रिया देताना यादव म्हणाले, ठमा. प्रविण भोटकर साहेबांनी माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यावर दाखवलेला विश्वास माझ्यासाठी अनमोल आहे. जिल्हाध्यक्ष म्हणून सहा वर्ष काम करताना मिळालेला अनुभव आता प्रदेश पातळीवर उपयोगात आणणार आहे. संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रत्येक गोरगरीब, वंचित, दिव्यांग व दुर्धर आजाराने त्रस्त रुग्णापर्यंत, शेवटच्या घटकापर्यंत मदत पोहोचवणे हे माझे ध्येय असेल. ही निवड माझी नसून, खामगाव व बुलढाणा जिल्ह्यातील प्रत्येक रुग्णसेवकाची व माझ्या सहकाऱ्यांची आहे.ठ सूरज यादव यांच्या या निवडीबद्दल खामगावसह संपूर्ण बुलढाणा जिल्हा, विदर्भ व राज्यभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनेक सामाजिक संस्था, रुग्णसेवक, दिव्यांग बांधव व नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.अशी माहिती रुग्णसेवक आशिष सावळे अकोला यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.






# श्रीक्षेत्र शेगाव येथे श्री परमहंस परशराम महाराज यांच्या महिमा ग्रंथांचे सामूहिक पारायण

प्रतिनिधी १ जून



**बुलडाणा :** श्री परमहंस परशराम महाराज सेवाधारी परिवार, जळतापूर/पिंपळोद यांच्या वतीने ७ जून रोजी श्रीक्षेत्र शेगाव येथे भव्य सामूहिक पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री परमहंस परशराम महाराज यांच्या महिमा ग्रंथांचे पारायण सकाळी ८.३० वाजता सुरू होणार असून हा ऐतिहासिक सोहळा श्री माहेश्वरी भवन, एसटी स्टँड समोर, शेगाव, येथे संपन्न होणार आहे. या धार्मिक व ऐतिहासिक सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. तसेच आदल्या दिवशी येणाऱ्या भक्तांसाठी ६ जून रोजी श्री माहेश्वरी भवन येथे निवासाची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. सोहळ्याचे आयोजन श्री परमहंस परशराम महाराज सेवाधारी परिवार, जळतापूर/पिंपळोद यांच्या वतीने करण्यात आले असून विविध भागांतील सेवाधारी व समाजबांधव या आयोजनात सक्रिय सहभाग घेत आहेत. आयोजक सेवाधारी म्हणून जयंत वानखडे, गोकुळ शेगोकर, शंकरराव खवले, शरदराव देवरणकर, जयंत पुसदकर, भालचंद्रराव कथलकर, राजू कथलकर, अशोकराव भारसाकळे, प्रशांत देशमुख, परशराम डोरस, पुरुषोत्तमराव खंडार, सुरेशराव रोहनकर, कैलासराव डांगे, शुभमराव पुसतकर, ओम मोरे, मोहनराव पंडीत, दिपकराव राजनकर हे विशेष परिश्रम घेत आहेत. या पारायण सोहळ्यासाठी भाविकांनी तात्काळ नोंदणी करावी, असे आवाहन आयोजक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शत प्रतिशत भाजपाचा नारा देणारे लोकनेते स्व. भाऊसाहेब फुंडकर यांना पुण्यतिथीनिमीत्य अभिवादन

## 'शक्ती स्थळी' भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची गर्दी

प्रतिनिधी १ जून

**खामगावः** लोकनेते स्व.भाऊसाहेबजी फुंडकर यांच्या पुण्यतिथी निमीत्य आज सकाळी ना. ॲड. आकाश फुंडकर यांच्यासह त्यांच्या मातोश्री श्रीमती सुनिताताई फुंडकर, बंधु श्री सागरदादा फुंडकर, खामगांव नगरीच्या नगराध्यक्षा सौ अपर्णाताई फुंडकर सौ स्नेहाताई फुंडकर यांचेसह कुटूंबीयांनी अभिवादन केले.

पांडुरंग पुंडलिक तथा भाऊसाहेब फुंडकर यांचा जन्म २१ ऑगस्ट, १९५० रोजी झाला होता. त्यांचे दि. ३१ मे २०१८ रोजी मुंबई येथे हृदय विकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. ते भारतीय जनता पार्टीचे एक शांत संयमी राजकारणी अशी त्यांच प्रतिमा होती. त्यांनी संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ते भाजपा असा प्रवास केला.

महाविद्यालयीन शिक्षण खामगांव येथे घेत असतानांच ते अखिल भारतीय विद्यार्थी परिषद मध्ये सक्रिय झाले होते. १९८९ ते १९९८ या कालावधी मध्ये अकोला लोकसभा मतदार संघातून खासदार होऊन कॉंग्रेस च्या वर्चस्वाला सुरुंग लावण्यात त्यांना यश आले. ते भारतीय जनता पक्षाचे उमेदवार म्हणून नवव्या, दहाव्या आणिअकराव्या लोकसभेत महाराष्ट्र राज्यातील अकोला लोकसभा मतदार संघातून निवडून गेले. आणि याच काळात अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी या दिग्गज नेत्यांशी संपर्क वाढला. राज्याचे भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष असतांना त्यांनी 'शत प्रतिशत भाजपा' हा नारा दिला. त्यांचे हे स्वप्न आज खरे होतांना दिसत आहे. देशात, राज्यात व खामगांव मतदार संघात आज शत प्रतिशत भाजपा झालेला आहे.




११ एप्रिल २००५ ला विरोधी पक्षनेते म्हणून निवड करण्यात आली. जून २००९ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते सन २००६-२००७ या कालावधीतील उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले

तसेच २५ एप्रिल २००८ रोजी दुसऱ्यांदा विरोधी पक्षनेता म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. सन २०१६ ते २०१८ ते महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री होते. त्यांच्या कार्यकाळात अनेक शेतकरी हिताचे निर्णय घेण्यात आले. मागेल त्याला शेत तळे, कांदाचाळ व शेती अवजारे खरेदी मध्ये सरळ खरेदी चा अधिकार शेतकऱ्यांना दिल्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना त्याचा मोठा फायदा झाला. अशा या लोकनेत्याला अभिवादन करण्यासाठी हजारोंच्या संख्येने शक्ती स्थळी आले होते. ना.भाऊसाहेब फुंडकर यांना अभिवादन करण्यासाठी अकोला जिल्हयासह बुलढाणा जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधी व भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते तसेच हितचिंतक व भाजपा प्रेमी, यांनी शेगांव रोड वरील सिध्दी विनायक टेक्नीकल कॅम्पस येथील स्व.भाऊसाहेब फुंडकर यांच्या समाधीस्थळी 'शक्ती स्थळी' भेट देऊन माल्यार्पण अर्पण करुन अभिवादन केले. याठिकाणी हजारो कार्यकर्त्यांनी शक्तीस्थळी गर्दी केली होती.

आज भाऊसाहेबांचे 'शत प्रतिशत भाजपा' चे स्वप्न केवळ खामगांव मतदार संघातच नाही तर संपर्ण देशात प्रत्यक्षात उतरतांना दिसत आहे. परंतु ते पहायला आज आमचे भाऊसाहेब या जगात नाहीत. आज पक्षासाठी जिवाचे रान करणारे हजारो लाखो कार्यकर्ते आहेत. त्यांच्या त्यागामुळे भारतीय जनता पार्टी आज या उच्च स्थानावर पोहचली आहे. नुकत्याच झालेल्या पश्चिम बंगालच्या निवडणुकीत आपण पाहिले मजबूत कार्यकर्त्यांमुळेच भाजपाला पश्चिम बंगाल मध्ये सत्तेत येता आले. आज संपुर्ण देशभरातील भारतीय जनता पार्टीचे 'शत प्रतिशत भाजपाचे' हे चित्र स्व. भाऊसाहेबांनी पाहिले असते तर त्यांचा आनंद गगनात मावला नसता.

**ना.ॲड. आकाश पांडुरंग फुंडकर,**
कामगार मंत्री महाराष्ट्र राज्य.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

सोमवार, दि. १ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# प्लॉटिंग माफिया आणि लोकप्रतिनिधींची अभद्र युती

## खुल्या भुखंडावर गटार योजनेची खिरापत

प्रतिनिधी १ जून

**अकोला :** जुन्या शहरात खारे पाणी असलेल्या भागातील प्लॉट चे भाव वाढण्यासाठी लोकप्रतिनिधीच्या दबावात भूमिगत गटार योजनेचा विकास केला जात आहे. पण, या भागातील प्लॉटला तसाच उठाव नसल्याने लोकप्रतिनिधीचा पैसा यात अडकल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. हद्दवाढीच्या भागात, खाऱ्या पाण्याच्या एरियात, खाजगी प्लॉटचे भाव वधारण्यासाठी सरकारी निधीचा गैरवापर होत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. लोकप्रतिनिधीचे पैसे गुंतलेल्या भागात बनावट विकासकांना फायदा पोहचविण्यासाठी थेट गटर योजना राबविल्या गेल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.





खुल्या जागा, खुले प्लॉट आणि इथे रस्ते देखील प्लॉट टाकल्यानंतर केले गेले नाहीत. इतकेच काय तर इलेक्ट्रिक पोल देखील उभे केले गेले नाही. अशा राजेश्वर कॉलनी, साई कॉलनी, गोकर्णा कॉलनी जाजू नगर अन्नपुर्णा माता मंदिरामागे थेट गटर योजना राबविण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ज्या भागात लोकवस्ती नाही, नागरिक राहत नाही, मलजल निर्माण होत नाही अशा ठिकाणी कुठल्या आधारावर ही सरकारी योजना राबविली गेली याचा खुलासा महापालिका आणि गटर योजना राबविणाऱ्या कंपनीचे अभियंता हुंगे करतील काय अशी विचारणा होत आहे. शासकीय निधीचा हा गैरवापर असून यासाठी एका लोकप्रतिनिधीने वजन खर्ची घातल्याची माहिती आहे. या लोकप्रतिनिधीचे या ठिकाणी प्लॉट असून ते दूसऱ्याच्या नावावर असल्याची माहिती आहे. त्या प्लॉटचे भाव वधारण्यासाठी या ठिकाणी थेट गटर योजनेचे काम केल्याचे चित्र आहे. प्लॉट विकास करताना आवश्यक रस्ते, नाल्या आणि इलेक्ट्रिक पोल येथे नाही पण, गटर योजना येथे राबविल्या गेल्याचे चित्र मात्र आहे. शहरात ज्या भागात लोकवस्ती आहे. नागरिक राहतात. त्या ठिकाणी मात्र नाल्याचे पाणी खुल्या प्लॉट साचत असून त्या ठिकाणी भूमिगत गटर योजना नाही मात्र नव्या भागात कुठल्या आधारावर गटर योजना टाकली अशी विचारणा होत आहे.

# लोहा बाजार गल्लीतील नाल्याचे अर्धवट काम ठरणार डोकेदुखी

### पावसाळ्याच्या तोंडावर गांधी रोडवरील अनेक दुकानदार चिंतेत

प्रतिनिधी १ जून



**अकोला :** शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या गांधी रोड ते सिटी कोतवाली रोडच्या उत्तरेकडील बाजूस असलेल्या शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या मागे, लोहाबाजार गल्लीकडे जाणाऱ्या नाल्याचे बांधकाम सध्या अर्धवट अवस्थेत रखडले आहे. पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना, या अर्धवट नाल्यामुळे परिसरातील व्यावसायिकांच्या दुकानांमध्ये पाणी शिरण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

कंत्राटदाराने या भागात नाल्याचे काम अर्धवट करून ठेवले आहे, ज्या मुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह थांबला आहे. त्यातच या अर्धवट नाल्याची योग्य प्रकारे सफाई देखील करण्यात आलेली नाही. परिणामी, थोडाही पाऊस झाल्यास या नाल्याचे पाणी तुंबून थेट गांधी रोडवरील व्यापारी गाळ्यांमध्ये आणि दुकानांमध्ये शिरण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. लोहा बाजार आणि गांधी रोड हा अकोला शहरातील अत्यंत गजबजलेला आणि मुख्य व्यापारी भाग आहे. इथे दुकानांमध्ये लाखो रुपयांचा माल साठवून ठेवलेला असतो. नाला अर्धवट असल्याने 'पावसाळ्यात हा मौल्यवान माल सुरक्षित कुठे ठेवायचा?' असा संतप्त सवाल आता स्थानिक दुकानदारांकडून विचारला जात आहे. जर वेळेत नाल्याचे काम पूर्ण झाले नाही, तर व्यापाऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागू शकते. स्थानिक नगरसेवक आणि लोकप्रतिनिधींनी या गंभीर समस्येकडे त्वरित लक्ष देऊन मनपाच्या संबंधित विभागाकडून हे काम युद्धपातळीवर पूर्ण करून घ्यावे.नाला निर्मिती पूर्ण होईपर्यंत किमान तिथला पाण्याचा प्रवाह मोकळा राहील आणि नाला सफाई नीट होईल, याची तात्काळ व्यवस्था करावी.शहरात पावसाळापूर्व कामांचे दावे महानगरपालिकेकडून केले जात असले, तरी लोहा बाजार गल्लीतील हे दृश्य मनपाच्या ढिसाळ नियोजनाची साक्ष देत आहे. आता व्यापारी वर्गाचे नुकसान टाळण्यासाठी पालिका प्रशासन यावर काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महापालिकेच्या 'दिव्याखाली गडद अंधार'

## ओपन जिमचे लाखोंचे सामान पडले भंगारात!

प्रतिनिधी १ जून



**अकोला :** अकोला महानगरपालिका प्रशासन शहराच्या विकासाचे आणि सौंदर्यीकरणाचे मोठे दावे करत असले, तरी प्रत्यक्षात मात्र महापालिकेच्या 'दिव्याखालीच गडद अंधार' असल्याचे समोर आले आहे.

मनपाच्या मुख्य इमारतीपासून अवघ्या हाकेच्या अंतरावर असलेल्या राधाकिसन प्लॉट भागात, नागरिकांच्या आरोग्यासाठी आलेले ओपन जिमचे लाखोंचे सामान उघड्यावर भंगार अवस्थेत पडले आहे. हा संपूर्ण परिसर कुलूपबंद (लॉक) असल्याने हे साहित्य नागरिकांच्या हक्काच्या वापराअभावी सडत चालले आहे. राधाकिसन प्लॉट येथील महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या मागच्या बाजूला ही ओपन जिम प्रस्तावित करण्यात आली होती. यासाठी शासनाच्या निधीतून लाखो रुपयांचे अत्याधुनिक व्यायामाचे साहित्य देखील खरेदी करण्यात आले. मात्र, कंत्राटदार आणि मनपाच्या क्रीडा व बांधकाम विभागाच्या अनास्थेमुळे हे साहित्य अनेक महिन्यांपासून उघड्या मैदानात ऊन-पावसात सडत आहे. जिमसाठी ठरवलेली जागा ही प्रशासनाकडून लॉक करून ठेवण्यात आली आहे. परिसरातील तरुण, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना या साहित्याचा कोणताही लाभ घेता येत नाही. एकीकडे आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी ओपन जिमची संकल्पना राबवली जात असताना, दुसरीकडे मात्र हक्काचे साहित्य उपलब्ध असूनही ते कुलूपबंद ठेवल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. पावसाळा तोंडावर असल्याने हे साहित्य अधिक खराब होण्याची भीती आहे, त्यामुळे पालिका आयुक्त यावर तात्काळ 'ॲक्शन' घेणार का, याकडे अकोलेकरांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र एक्स्प्रेसची धडक ; एका महिलेसह 15 बकऱ्यांचा मृत्यू

### ♦ खुमगाव रेल्वे परिसरातील घटनाः परिसरात हळहळ

प्रतिनिधी १ जून

**नांदुरा :** तालुक्यातील खुमगाव रेल्वे परिसरात रविवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात एका महिलेसह १५ धडक बकऱ्यांचा मृत्यू झाला. भुसावळ-नागपूर रेल्वेमार्गावर धावणाऱ्या महाराष्ट्र एक्स्प्रेसची लागल्याने ही दुर्घटना घडली. लताबाई नारायण सांगळकर (वय ५८, रा. खुमगाव) असे मृत महिलेचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सायंकाळी साडेचार ते पाच वाजण्याच्या सुमारास लताबाई सांगळकर या खुमगाव रेल्वे परिसरात बकऱ्या चारत होत्या. यावेळी काही बकऱ्या रुळावर गेल्या. दरम्यान, समोरून महाराष्ट्र एक्स्प्रेस येत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. बकऱ्यांना रुळांवरून हटविण्याचा त्या प्रयत्न करत असतानाच रेल्वेगाडी जवळ आली. त्यामुळे त्यांना सुरक्षित ठिकाणी जाता आले नाही. या अपघातात लताबाई सांगळकर यांच्यासह तब्बल १५ बकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच, नांदुरा पोलिस ठाण्याचे कर्मचारी गजानन इंगळे, विलास निबोळकर, आश्विन फेरण घटनास्थळी दाखल झाले.

# अंडरपासमध्ये कचरा आणि घाणीचे साम्राज्य कायम

प्रतिनिधी १ जून



**अकोला :** उड्डाणपुलासोबत गिफ्ट आलेल्या अंडरपासची कथा अकोलेकरांना चांगलीच माहिती आहे. यंदा देखील पावसाळ्यात या अंडरपासमध्ये कोणाचा जीव जाईल काय अशी विचारणा होत आहे. अंडरपास मधील बिकट अवस्था कायम आहे. अकोला शहरातील एकमेव अंडरपास पावसाळ्यात चांगलाच चर्चेत असतो. पाणी तुंबले की हा अंडरपास बंद होतो. तसे ही या अंडरपासचा वापर अकोलेकर करत नाही. या ठिकाणी नाल्या इतक्या मोठ्या आहे की दूचाकीचे चाक धडाधड आपटतात. त्याचा झटका मानेला बसतो. अंडरपास मधील लाईट्स अर्धे सुरु आहे अर्धे बंद.इतकेच नाही तर अंडरपास मधील नाल्यांमध्ये घाण साचली असून ती साफ करण्यात आली नाही.











# आता क्यूआर कोडमुळे बनावट दंतवैद्यांना बसेल आळा

### ♦ दंतक्षेत्रात येईल पारदर्शकता

प्रतिनिधी १ जून



**अकोला :** दंतवैद्य बनणे हे सर्वात सोपे आहे. दंतवैद्यकीय पदवीची आवश्यकता नसते. तुम्हाला फक्त दातांच्या आजारांची प्राथमिक माहिती आणि काही आवश्यक औषधांची नावे लक्षात ठेवता येणे पुरेसे आहे. दररोज २,००० ते ४,००० रुपये किंवा दरमहा ६०,००० ते १ लाख रुपयांपर्यंतची कमाई निश्चित असते. ही फसवणुकीची प्रथा अनेक शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर चालते. अनेक दंतवैद्यांकडे बॅचलर ऑफ डेंटल सर्जरी (BDS) पदवी किंवा क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट कायद्यांतर्गत नोंदणी सुद्धा नसते. एखाद्या लहान दुकानाला दवाखान्याचे स्वरूप देऊन, ते औषधे लिहून देतात आणि आपले उत्पन्न वाढवण्यासाठी लोकांचे दात विनाकारण काढतात.

अनेकांना या नकली दंत वैद्यांकडे उपचार केल्यानंतर पैसे तर गमवावे लागतातच परंतु तोंडाचे आरोग्य सुद्धा खराब झाल्याचा अनुभव आलेला आहे. दरम्यान, राज्य दंत परिषदेने पुष्टी केली आहे की राज्यात हजारो बनावट दंतवैद्य आपली दुकाने चालवत आहेत. त्यांच्याकडे असंख्य तक्रारी आल्या आहेत, त्यामुळेच राज्यातील बनावट दंतवैद्यांची वाढती संख्या रोखण्यासाठी, महाराष्ट्र राज्य दंत परिषद एमबीबीएस डॉक्टरांसाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेप्रमाणेच दंतवैद्यांसाठी नो युवर डेंटिस्ट अर्थात 'तुमच्या दंतवैद्याला ओळखा' (KYD) मोहीम राबवत आहे. या नवीन उपक्रमांतर्गत, नागरिकांना क्यूआर कोडद्वारे दंतवैद्यांची अधिकृतता, नोंदणी आणि पात्रतेबद्दल माहिती दिली जाईल. या उपक्रमाचा उद्देश बनावट दंतवैद्यांना आळा घालणे आणि दंत क्षेत्रात पारदर्शकता वाढवणे हा आहे.

राज्य दंत परिषदेने सांगितले की, परिषदेकडे नोंदणी केलेल्या प्रत्येक दंतवैद्याला एक अधिकृत केवायडी पत्रक दिले जाईल. ते क्लिनिकच्या प्रवेशद्वारावर किंवा प्रतीक्षा कक्षात ठळकपणे लावणे अनिवार्य असेल. या पत्रकावरील क्यूआर कोड स्कॅन करून, रुग्ण दंतवैद्याची नोंदणी, पात्रता आणि वैधतेची माहिती त्वरित मिळवू शकतील.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK